MADRAS GOVERNMENT ORIENTAL

MANUSCRIPTS SERIES. No. 64.

©

GOVERNMENT OF MADRAS

1959

# ॥ भोंसले व पेशवे यांचे बखर ॥

# BHONSLE AND PESVA'S BAKHAR

*Edited by*

T. CHANDRASEKHARAN, M.A., L.T.,

Curator, Government Oriental Manuscripts Library,

Madras

and

The Staff of the Library.

TNSDA

07051

Published under the Orders of the

Government of Madras.

Price 1·75

MADRAS GOVERNMENT ORIENTAL

MANUSCRIPTS SERIES. No. 64.

©

GOVERNMENT OF MADRAS

1959

# ॥ भोंसले व पेशवे यांचे बखर ॥

# BHONSLE AND PEṢVA'S BAKHAR

*Edited by*

T. CHANDRASEKHARAN, M.A., L.T.,

Curator, Government Oriental Manuscripts Library,

Madras

and

The Staff of the Library.

**Published under the Orders of the**

**Government of Madras.**

Price 1·75

# INTRODUCTION.

This is a small chronicle in Marathi recorded in Modi script available in the Government Oriental Manuscripts Library Madras, bearing No. M. 195. This is one of the many collections of Marāthi manuscripts, collected by Col. Mackenzie, during his term of office as Surveyor-General in the service of the Mysore Government. This contains nearly 369 pages of quarter size, neatly bound. It may be observed that more than two scribes are employed for transcribing the manuscript. The name of the author or the date on which the original was written and other particulars are not mentioned. A few folios which were damaged have been reconditioned. The manuscript contains a large number of unfamiliar words, phrases and abbreviations in Persian and Arabic languages. The chronicler uses more than two calendars in dating the episodes and occurances alluded to in this work. It should be borne in mind that chronicles in general, like this chronicle, contain a large number of mistakes, both grammatical and literary and this is only a sample to show to the student of history the way in which chronicles in Marathi were produced in the last two centuries. This is a true reproduction in Devanāgarī characters without any omissions and commissions. The manuscript is neither punctuated nor paragraphed. At times the descriptions of events are not properly arranged according to their dates.

This record contains more particulars regarding the Maratha rulers than that of the Peṣvas. The latter part is very briefly dispensed with. The manuscript begins with the origin of the Bhonsles. The geneology of this clan mentions the various names of the forefathers of Shivaji the Great. Detailed description about Shāji, Shivāji the Great, Sambāji, Rājārām and others are given. The chronicler describes the birth, boyhood, campaigns, wars, sieges, conquests, construction of forts and makes mention of the names of the cities, towns and temples by Shivāji. The arrest and imprisonment of Shivāji by the Mogul Emperor, and how he escaped, have been very graphically described. The episodes relating to Afsalkhan and Shaistkhan are

also mentioned. The coronation of Shivāji and the amount spent on that occasion and something about his administration are also described. The last days of Shivāji, the intrigues in the Marātha court to eliminate Sambāji from his legitimate claim to the throne of his father and how finally he succeeded in securing the throne, form the last events in the chronicle regarding Shivāji the great. The trial of Sambāji by the Mogul Emperor and his execution are very concisely dealt with. A few references are made about the unsettled condition of the Marātha state during the administration of Ṣambāji and his minister Kalush.

A few brief references are made about the Peṣvas which are of minor importance.

In the last page of the manuscript a brief reference about the dates of birth and death of the Marātha saint and poet Jñānadev are given.

This manuscript is a transcription of an original owned by one Bachoba Putniker, a resident of Poona. It is stated that the clerks Narayana Rao and Ananda Rao in the service of Col. Mackenzie, the Superintendent in the service of the Mysore Government were responsible for transcribing the original manuscript. The name of the author of the original or his place of residence or his date and such other particulars are not provided. The original manuscript is said to have been in the possession of Bachoba Putniker residing at Poona. The record was said to have been transcribed on the 25th day of July 1870 while camping at Poona. My thanks are due to Sri. K. T. Rao, Marathi Pandit of this Library for preparing the press copy of the manuscript and going through the proofs.

T. CHANDRASEKHARAN,
*Curator,*
Madras Government Oriental Manuscripts Library, Madras.

Madras
28-2-59

# SYNOPSIS

This small chronicle in Marathi recorded in Modi characters deal with the history of the first two Marāthā rulers namely Śivāji and Sāmbāji and very little is said about the Peśvās. The episodes mentioned in the chronicle may not be of any new additions to the facts already available. Long list of names of persons and places, who took active part with Sivāji and Sāmbāji in their various campaigns are alluded to in the chronicle.

The chronicle contains long and incomplete sentences, descriptions, expressions and words spelt erroneously. In order to facilitate easy location of the some of the Historic episodes their contents are given in English in a concise manner with their corresponding pages where they occur. As stated in the introduction, this is a chronicle without author and no authenticity could be guaranteed for the episodes and the names of persons mentioned in it. In the last part of the original record it is stated that this chronicle was possessed by one Baccōbā a resident of Poonā and transcribed by the clerks of Col. Mackenzie. The chronicler has not expressed his identity or the sources of information he obtained for recording the chronicle. This is only an attempt to publish some of the chronicles available in this Library.

(pages 1—6) The first forefather for the so called Prathāpa Vamśāvali of the Bhonsle family, was said to be a person called Bābaji Bhonsle, a patil of villages Hinganee, Devool, and Bardey situated in Poonā District. He had two sons named Śāji and Serfji. Śerfji had two sons called Thirumbakji and Umāji. The younger brother Viṭṭōhji had eight sons and the names of only two sons are mentioned as Keloji and Mandūji respectively. Since Kelōji was a playful child during his boyhood, he was called so. On account of some unknown reasons the abovesaid two brothers resigned the services of Mansubdar and migrated to Daulatabad. They settled at Sindeegad. Lukji Jādāve a Deśmuk of that place appointed the two brothers in his estate. Malōji had no children. His wife prayed to the Peer of Ahamadnagar to bless her with a son. When a son was born to her, the child was christened as Śājī, in gratefulness of the blessings of the Peer.

Lukji Jādave had also no children and afterwards a daughter was born to him and the child was called Jijā Bāi. When Śāji was five years old he was taken to a feast in the house of Lukji Jādave. Jādave being pleased with the beauties of both the children, expressed that if they are wedded together they will form a good match. On that occasion Mālāji declared that he has become a close relation to Jādave Rāo. The proposal made by Jādave Rāo was not approved but was resented by the ladies of Jādāve Rāo. The two brothers were removed from the service and was asked to leave the village. They left for a village called Verūl and narrated the Patil what had taken place. The two brothers were ardent devotees of God Śivā. They secured a big treasure trove and with that they had a militia of their own. They wanted to revenge Lukji Jādave. While they were marching against Jādave Rao they hunted certain pigs and cast them in a Masjid with labels tied round the neck; of the pigs mentioning the injustice done to them by Lukji Jādave. The Badśa, then requested Jādave Rāo to give his daughter in marriage to Śāji; and the brothers were appointed as Mansubdars. They then settled at Daulatabād. When Śāji was twenty five years of age his father died. At that time the Bādśā of Daulatabād committed suicide leaving his two infant sons. As there were no proper persons to administer the Sultanate, Sambāji Anant a Brahmin was appointed as a regent. Sambāji Anant reconmmended Śājī Bhonsle to be appointed as a Mansubdar and requested him to take charge of the military administration of the Sultanate. From this onwards the Bhonsles became powerful persons at Daulatābad.

(p. 6—9) Lukji Jādave was not pleased with this arrangement. He invited the Badśa of Delhi to invade Daulatābad. Lukji met the armies of Bādśā on the banks of Narmadā and proceeded against Daulatābad. Śājī inferring the danger made arrangements to send all the ladies to places of safety. At that time Jījā was pregnant, and could not withstand the strain of the rapid march of the horsemen. She was said to have been deserted on the way; and was picked up by the men of Lukji and removed to Fort Śāvanerī. A few days afterwards à son was born to her. This child was no other than Śivāji, the hero of the chronicle. The child was said to have been born on the bright part of Vaiśāk month of Śalivāhanā 1149.

On the 30th day of Badrabad month in 1556 Śalivāhana Śājī weighed himself against gold and distributed the same to Brāhmins. This was said to have been done on the banks of river Bhīmā in the village Nāgeer. This village afterwards was renamed as Tulāpur.

Śivāji was entrusted to the care of Dādāji Goṇd Deve, a Kulkarnī of Hingani village. He taught Śivājī all the requisite knowledge.

(p. 10—12) As per the wish of Śājī, Sivājī and his mother were brought to Poonā. Śivājī rendered many meritorious deeds and constructed and captured many hill forts. Their names are given in detail. Śāji remarried again one Thukā Bai and he got a son. He was named as Ekōjī. Śāji led an expedition as per the request of the Nāick ruler of Trichinopally against the Nāick Rāja of Tānjore. Śāji defeated both the Nāick and took possession of Tānjōre and left the country to the care of Ekōjī. Since Śivāji violated the wish of Dādāji Gōnd Deve, the latter is said to have died by poisoning himself.

(p. 13—15) Śivāji appointed trustworthy friends as officers in the forts captured by him; and settled at Poonā. In turn Aurangazeeb and the Sultan of Bijāpur wanted to subdue Śivājī, for he was resenting and discarding their orders.

(p. 16—19) The battle between Śivāji and Candra Rāo Moreē is described graphically. Afsal Khān was sent with the mission of subduing Śivāji.

(p. 20—23) The episode relating to the assasination of Afsal Khān is described. The dead body of Afsalkhān was said to have been removed to Tulajāpur. Śivājī last no time in strengthening the forts he has conquered. The names of the forts are given.

(p. 24—26) The battle between Śivājī and Side Dalāl and Farāzkhān are described. The episode relating to the flight of Śaisṭṭakhān is also described.

(p. 27—28) Aurangazeeb being enraged at the insult done S'aisṭṭakhān, despatched a big army under Ram Singh to capture S'ivājī and all the forts owned by him. Dalāl Khān besieged Fort Purandar and the history relating to the agreement made between

S'ivāji to go over to Delhi to meet Aurangazeb to answer all the charges levelled against him. The names of the persons who marched along Śivājī to Delhi are mentioned. Some of them are Thirambak Panth, Nirāji Rāojī, Prathāpa Rāo Guzar, and others. The episode relating to the court at Delhi and how S'ivāji and Sāmbāji were imprisoned are told in great length. S'ivāji and Sāmbāji were said to have been kept within the well guarded buildings.

(p. 30—32) S'ivājī managed to escape along with his son Sāmbāji. Other friends of theirs also joined them in the outskirts of Delhi. The names of places they travelled and the persons they encountered are also told here. It is stated that since Sāmbaji could not bear the strain of travelling, was left in charge of Nānaji Viśvanāth, a Brahmin residing at Vārnāśī. S'ivāji and the party reached Rāi Gad. Sāmbāji also returned to Rai Gad. Nānaji was richly presented by Śivājī for the act of kindness done by him.

(p. 33—38) While camping on the banks of Thungabhadrā S'āji had a fall from the horse during hunting and died. The conquests by S'ivāji and his warfares are vividly described. S'ivāji was said to have travelled to the far South up to Rameśwaram. After the ceassation of hostilities S'ivāji set right the machinery of administration of the country; and appointed trustworthy persons as the Managers of the Forts under him. S'ivāji celebrated his thread marriage ceremony and coronation in a most befitting manner. The amount spent on those occasions are given in detail. S'ivāji weighed himself against gold and distributed the same to various Brahmins.

(p. 46—57) While Sāmbāji was at Fort Panāl, Akbar S'a one of the sons of Aurangazeb reqested the protection of the Marāthās and as per his request was allowed to reside at Jaipur. Sāmbāji was not in good terms with S'ivāji. S'ivāji constructed many more forts and equiped them with men and materials. The names of the forts are given in detail. After a brief illness S'ivāji breathed his last at 2 o'clock on a full moon day in the month of Caitrā in Rāudrināma Samvatsaram in S. S. 1602. The condition of the State and the administration of the country was in a most unsatisfactory manner. Intrigues and foul plays were rampant

in the Court. The powerful officers formed in groups and wanted to rule as they liked. Sambājī was away and a few interested persons wanted Rājārām to ascend the Marāthā throne. Sāmbāji was more powerful and put down all the rivals and ascended the throne. Rājārām fled away to Jinji.

(p. 56—62) Sāmbāji conferred rich presents and responsible posts to his friends. Kavi Kalush became the adviser to Sāmbāji. The public resented the administration of Sāmbāji. Trustworthy friends deserted him. Aurangazeeb despatched a big army to subdue the Marathas. Sāmbāji and his infant son S'ahu were betrayed by Kavi Kalusu. They were arrested and brought before the Emperor at Delhi. The episode relating to the trial of Sāmbāji and beheadment by Aurangazeeb is described. After some years S'ahu was released and he became the ruler of the Marātā Country and died in S. S. 1672. Then Bālāji Bāji Rāo became the first Peśwa. In the Battle at Pāniput Viśvanāth Rāo son of Bālāji Bāji Rāo died. Ragunath Rao became the next Peśwa. Rajārām returned from Jinji. He died in the S. S. 1683; and his wife Ramā Bāi ascended the pyre of Rājāram.

॥ श्रीः ॥

# ※ भोंसले व पेशवे ※

—:※:—

प्रताप वंशावळ भोंसले राजे यांची मुळ पुरुष बाबाजी भोंसले पाठिल मौजे हिंगणी व देउळ गाव व वेरडी वगैरे ताळुके पावस प्रांत पुणे. यांची विस्तार त्यास पुत्र दोघे. त्यास तपशील जेष्ट पुत्र माळोजी भोंसले त्यांसी पुत्र दोघे १. शाहाजी १ शरफोजी एकुन दोघे. शरफोजी राजे यांस पुत्र दोघे त्रियेंबकजी राजे १. उमाजीराजे १. कनिष्ट पुत्र विटोजी भोंसले यास पुत्र ८. खेळोजी १. मंदाजी १. अनामीक साहा. एकुन आठ पुत्र. सदरहु मानसबदार होते खेळोजी यास (हे नाव कैसे आलेम्हणीजे) बळपणी फार खेळ करीत होत्या कारणे पातशाहा निजाम शाहा यानी हे नाव टेविले. अवरंगशा पातशायानी दिल्लीस तरखास येणे पुढें हाल करुन मारीले त्याचे (※ ※ ※ ※) उभयेतां माळोजी व विठोजी राजे भोंसले (यांचे) संमधे वृतीची कज्या करोन कबीले घेऊन कसबे वेरुळ नजदिक दौलताबाद येथे येऊन राहिलें. शेत पोत करुन होते. त्याउपरी मुले माणसे ठेऊन चाकरीचे उद्येश कसबे सिदखडे येथें आलें. तेथे राजेश्री लुकजी जाधवराव देशमुख सरकार दौलताबाद येथें हे मानसबदार निजामशहाचें बारा हाजार स्वारांची दौलतहोती, त्यास भेटुन त्याची चाकरी दरवाजीयावर भोय बारगीर करून राहिलें. शेरीर पुष्ट होते. घोडे स्वारीस त्याज बली टिकेना याज करीतां देवडीवर होते. भोजन पंगतीस असें दरमाहादार असामीस होन पांच येणे प्रमाणें देत होते. तेथे कितेक दिवस राहिले कविजहि त्या स्थळास आणिलें. त्यांस कनिष्ट बंधु विठोजी राजें यांस पुत्र खेळोजी व मंदाजी राजे भोंसले वगैरे आठ पुत्र जालें. वडील मालोजी राजे यांस पुत्र संतान नाहिं तेंव्हा त्याचे स्त्रिने अमदनगरच्या पीरास नवस केला जें. "अंम्हास पुत्र संतान जाहाली तर त्याचेनाव तुमची ठेऊ" ऐसी यास देवगतीनें त्यास पुत्र दोघें जण जालें. पीराचे नाव शाहाजी सफर होतें नवस पुरविलें मग जेष्ट पुत्राचे नाव शरफोजी राजे टेविलें त्या

माघे शाहाजी राजे स्वरुपाने बहुत उत्तम आणि गुणवंत असें. लुखजी जाधव राव यांस पुत्र संतान नव्होते एक कन्या जालि होती. तीचे नाव जीजाउ ठेविले होतें तीहिं बहुत स्वरुपे सुंदर होती. शाहजी राजे यास उत्तम वस्त्रे अळंकार करोन नित्य माहालांत नेऊन खेळवीत असतां कितेक दिवस जाले त्याउपरी शाहाजी राजे पांच वरुषाचा जाला अणि जिजाउ तीने वरुषाची जाहाली. त्यास पुढे फालगुण मास आला. त्याचे पोत्ता मांडीले. सिपाई मराटे कुल सरदार कचेरी आणुन राग रंगकेला - कलावणी श्री गुलाल बुका तबकें भरुन पुढे ठेविलें. दोघें खेलु लागली कवतुक जाधवराव पाहात असता मांडिवर मुल आहे तो चित्ति उदगार अणेन सभे मधे बोलिलाजें जीजाउ, सारीखे रत्न श्रीने पैदा केल आहे - ईश्वर चींता योग्ये शाहाजीराजे हे हिं बहुतच उत्तम आहेत ऐसे स्वभावीक सभे मधे बोलीले. तो पाठिसी मालोजी व विठोजी भोंसले याणी ऐकतांच उभे राहुन बोलिले जे आज पासुन जाधवराव अमचे व्याहिं जाले. थोर लोक सभे मधें बोली-त्यावरी मागे सरकणार नाहित सभे मधुन जाताना सभा नाईकासहि साक्ष टेवीले कीं जीजाऊ अमची सुन जाहाली. त्या उपरी जाधवरायानी काहिं उत्तर केला नाहिं बोलोन विचार पडले मग सभा खेळ जाला. जाधवराव माहालांत गेलें शाहाजी राजे यांस चैन जाल नाहिं. जीजाउस मात्र घेऊन गेले हे वर्ममान स्त्रीस कळलें नंतर जाधव राव माहालांत गेले आणि समाचार समजले कुणबी पाठील पोटासाटि तुम्हा जवळ पागें बारगीर कबुलकरुन राहिले - तुम्हास अणि मुलुकांत देशमुखी मानसवदार पाहुन बोलावें तेनकळें त्याणी कचेरीस साक्ष ठेऊन गेले तुम्ही त्यासी काहि उतर केल नाहि. जाधवराव बालीलें कीं अम्ही स्वभावीक पणे बोलिलो पण खोबरे वाटुन काहिं नक्षिये केला नाहि. त्याणि बोलिले तरीं त्यास आम्ही चाकरी वरुन दूर करोन मग दूसरे दिवसीं भोजनास मालोजीस व विठोजीस बोलाविलें त्याणी ओडुन आणिलेकी तुम्ही सोइरे जाला अम्हीं लग्न समइ भोजनास येऊ ऐसे बोलिलें. त्या उपरी जाधवराव कचेरीस आले. कारकुनास बोलाऊन उभयेताचे हिसाबकरोन चाकरी वरुन दुर केले. तुम्ही तुफानी आहां तरी येथुन कबुले सुधां जाणे क्षण येथे नराहाणे म्हणुन संगीतले. त्या उपरी मालोजीराजे व विठोजीराजे भोसले

लेंकरे मुले घेऊन मागती वेरुलास आले. पाटेलास भेटुन घर वशेत पुर्विल मागती करुन लागले. तेथे दोनी तीनी वरषे जालीयेची स्थीतीत राहिलें. त्यापासुन स्नान श्री सिवलिंगाची पुजा सांग केलावांन्चुन अन्न घेणे नाहिं. एकें दिवसी प्रदोश सोमवार इत्यादीक वृतें करावी हा नेम होता. त्या उपरी शेता मधे उभयेतां भाऊ मालीयावर राहण व राखण होतों—माघ शुद्ध १९. पौर्णिमेचे दिवसी प्रसन्न होऊन वारुलयांतुन हात चुडा सहवर्तमान निघोन मालोजी जागा होता त्यास अंतोन पलविले आणि विघ्युलते प्रमाणे द्रष्टीस पडले. विठोजीस निद्रा लागली त्यास जागेकरुन मालोजीनी सांगीतला. त्यानी ल्टक फास करन बोलीलेकी तुम्हास निद्रने घेरीले तरी आतां तुम्ही निद्रा करणकीं मी जागा बसतों म्हणोन बोलीले. त्याज वरून मालोजींनी निद्र केली तो स्वप्नामधे श्री देवी येऊन शुभ्र पातल धारण करुन कुंकुम अलंकार युक्त उभी राहिली त्यागृते करुन बोलीलीजे "तुजला प्रसन्न जाहाले आहे त्या वारुळात सर्प आहेत ते माझे स्वरुप आहे त्यास नमस्कार करुन वारुळ खाणुन साहा कढाया माल तेथे आहे तो घेणे व ते सर्प जाईल त्या त्याचे वाठेस जाणें तुम्हास सत्तावीस पीढ्या दिल्हे जे चित्तावर धराल तेहोईल" या प्रमाणे श्रीने अभये दिल्हे. त्या उपरी हे वर्तमान विटोजी भोसले यास श्रुत केले. सात कढाया माल रातोरातत वारुळांतुन काहाढीलां आणी गाडयावर घालुन घारास आणीलें. परसांत पते खणुन पुरुन टाकीलें. त्याउपरी शेतपोत विले कडुन बाईका मुले तेथे ठेऊन गुप्तरुपें आपण निघालें. ते कसबे गोध उर्फ चांभारगावास जाऊन तेयील सावकार पुरातन शेषोत्रानाईक पुढे लक्षादिपती होता त्यांची उभयेतानी जाऊन भेटिघेतली. आणि पहिला परीच्य होते त्यामुले एकांती त्याजवळ वैसुन सर्ववर्तमान सांगीतले. अमचे मनोरथ पूर्णकरणे—तोहि त्यास कबुल केले आणी बोलीलजे "तुम्हास राज्य प्राप्त जाहाल्यास अंहास काय धाल" याणी पोतदाराचे वतन कबुल केले. जो पर्येत अमचे भोसले सांचे राज्ये तो वर तुम्हांस वतन दिल्हे असे. त्या उपरी त्यास उत्तम वस्त्रे अलंकार देऊन गाडिवरी बसऊन कारवान बाहेर उतरलें होते तेथे जाऊन हाजार घोडे उत्तम कारवाना पासुन खरीधी केले. बारगीर व खासदार जीन खोगीर सिले खाना उत्तम सामान तयार केले डेरे व पालख्यो तयार करुन व

जंगपाळ निंबलकर फालठणकर त्याजवळ बारा हाजार फौज असे. ते पुढेवे करीत होत त्याजकड जासुध पाठऊन कौल आणौन मग ख्पण त्यचे वेठिस गेले कुल वर्तमान त्यासी जाहिर केल. अम्हाजवल एक हजार फौज आहे तुम्ही मदतीस दोनी हजार फौज देणे. तिन हजार फौजा निसी सडे होऊन लुखजी जाधवरावास गईच्प दाबा करीतों त्यास त्याणी कबुल करुन दोनी हजार फौज उत्तम भाले सिपाई देऊन याज पासीं हजार स्वार एकुण तीनी हजाराची पौजेनीसी सगईच्या दाब करावयास गेले. श्रीगोधे येथुन डेरे बसऊन साडे तीनहजार फौजानीसी निर्वेहादेरीच्य घाठे उतरुन नेवासीयावरुन गंगातरीस आले व सिकार केली. राण डुकरे दोन मारुन समागमे रातोरात रोजन नजदिक दौलतबाद तेथे येऊन मसिदीमधे मेली डुकरें याच्य गळ्यांत चिट्टी बांधुन टाकिले. चिय्यात पातशाहास अर्जलिहिलेजे. लुखजी जाधवराव व देशमुख परगणे मजकुरी याने आपली कन्या जिजाऊ अमच्या पुत्रास शाहाजीस देऊकेली सिमग्याचे पोस्तांत हजार मवळ्यासी मधे बोलुन स्त्रीयाचे बोले बमोनी करुन अम्हसि चाकरी वरुन दुर केले सुधा बाहेर घातले. त्यास्तव आणण व जंग पाळजी बालकस्याचें अश्रय करुन मसीधीत डुकरे मारीले या उपरी पातशाहानी अमची पाद देवाल आणि अमचे सोईरीक अम्हास देवतील तरी उत्तम नाहितरी जेंथोर तुमची पातशाहाहि तेथोर मसीधीत डुकर मारुन टाकु" या प्रमाणे चिठ्या बांधुन डुकरें टाकिळे आणी आपण रातोरात वनंगपाळ निंबळकर याज पांसी आले. प्रत.काळी मुजवर मसिदीत निम्पज पढयवास गेले. तो दोनी डुकर मेली पाहिली. गळ्योत चिठ्य पाहिल्या बहुत कष्टी जाले. डुकरे उचलोन दौलता बादास पातशाहा तस्कावर बसले होते तेथें पुढे आणोन टाकीली. चिठ्या पाहातांच पाहदशाहानी वाचुन पाहिल्या बहुत क्रोदायमान जाले. लुकजी जाधवराव यांस तलब करुन स्वारगडीद् पाठविली. ने समयई जाधवराव भोजन करीत होते. तलबा पोहंचुलि बदिल देऊन तैसच उठविले. तेच पुढे घालुन दौलताबादेस आणिले. भेठ घेऊन कुरनीशत करुन उभेराहिलें. पातशाहा बहुत क्रोधायमान होऊन चिठ्या पुढे ठाकोलें. डुकरेही दाखवीली आणी बोलीले जे आणीक कोणि उमराव असता हा उपरी मालोजी व विठ्ठोजी भोंसले याची पुत्र शाहाजी यास तुम्ही आपलि कन्या जीवाठस देऊन लग्न

करावें या गोष्टीस सिलकेलीया तुमचे मुलाजी राणार नहिं. जाधवराव घाबरे होऊन बोलीलेजे "पातशाह अभये देतील तर अर्जी करीन पातशाहानी अभये दीलहा जे तुमची मुद्दा असले तो कबुल केला. त्याजवरुन कुरनीशात करुन अर्जकेलाजे "मालोजी व विठ्ठोजी यांची पुत्र शाहाजीयास आपली कन्या आपलया हुकुमावर देतों. परंतु त्यास मनसबदार दाहा हजार घोडयोंची दयावयां कौल देऊन सरफराज केले पाहिजे. त्याचे अर्जावरुन पातशाहा मेहरबान होऊन कौल देऊन दौलता मनसब कबुल केला. कौलकरार करुन जाले मागुन पाठऊन मालोजी व विठोजी व शाहाजी पुत्र देखील दौलताबादेस आणि लें. जाधवराव समोर जाऊन घेऊन आले. पातशाहाची मुजनमत जाली पातशाहानी राजेयांची सुरत पाहुन खुश जालें. सीरोपाव हत्ती घोडेदैलत बारा हजार स्वार तिघास देऊन सरफराज केले. ज्या प्रमाणे जाधवराज त्याहुन विशेष दौलत दिलहि. जाधवरायास हुकुम जाहाला "तुम्ही आपला कबीलाबजी जाऊन नजरीसी सिदखेडाहुन दौलताबादेस घेऊन आणेणे. आपले रुबरु लग्न करु". त्याजवरुन सर्वास जाधवराव यांनी तेथुन दौलतेबादास अणौन लग्न सिद्धकेली. खुद्द पातशाहानी उमे राहुन लग्न संभारंभ केले. मालोजी व विठ्ठोजी याणीहि वेरुलास आपले कबले तेथेच आणीले. लग्न जालें ते समइ मालोजी व विठ्ठोजी राजे यांचे दिवाण अंबाजी गोविंद याचे अनुमते दौलत अमरसा पासुन जिजाउचे नग जतन करावयास जाधवरा व याणी गोमाजीगोपाळ समागमें नेहमी दिलेंहे. त्याज उपरी शेतांतील द्रव्य काहा डुन धर्म बहुत केला. श्री वेरुळाचे देवालय बांधीले. ठाई ठाई विहिरी बाग केले. श्री माहादेवी मालोजी राजे यांणी तेळ बांधिले ऐसो कीर्ती केली. शाहाजी राजें यांचे उमर पांच व येकवीस येकुण पंचवीस जाहाली. वडील तीर्थरुप शांत जाले. त्यासमई बादरीन निजामशाहा पातशाहा अपमृत्यु शांत जालें. त्यासी पुत्र दीवे. बहुत लाहान होते. मुलाचे आयाहो वया सांबाजी आनंत ब्राम्हण मुतसद्दि थोर अकरुवंत होता. त्यास बोलावुन नायकानी पुसले पातशाहाहिस वजीर दिवाण अकलवंत पाहिजे त्यांसीवाये बंदोबस्त होत नाहिं. त्याज वरुन सांभाजी अनंत यानि पाहाताशाहाजी राज्य भोंसले सुरतला येक अकलवंत देखोन सिपाई असे जाणौन वायकांकडे माहालांत नेले म्हणुन सांगीतले को हा दिवाण व वजीराचे कामास लायक आहे

म्हणन अर्ज केला. त्याजवरुन बयकाचे चिवास आले कीं मुले दोघे त्यांस त्याचे मांडविर बसवली. सिरोपाव दिल्हें. पातशाहाचे मुले घेऊन शाहाजी राजे तख्तावरी बैसोने लागले. खालते वजीर वगैर मनसबदार लोक उभेराहुन मुजरा करुन लागले. ऐसे कारभार कितेक दिवस करुन लागले. पातशाहाहिचे बंदोबस्ती येथास्थीतींत केला. त्याजवर जाधवरायाचे चित्तांत खेद पाहुन बहुत जाहालाकीं "कुणबी पाठिल देशानी केला अमचे घरी बारगीरी करुन होते ऐसे असता जोचावरीने सोइरोक केली. पातशहाची मुले तख्त्यावर घेऊन बैसातात आणि अम्ही खाले उभराहुन मुजरा करावा हे उत्तम नाहिं म्हणौन दुःख जालें. त्याजवरुन मनसब करुन दिलीस शाहाजाहें पातशाहा यास अर्ज व वकील पाठऊन मीरजमला सुभा साठिहजार फौज उतरेहुन आणीवीली, जाधवराव वगैरे सरदार नर्मदा तीरास जाऊन भेटले. मग जाधवराव आपण हॊराल होऊन दोलताबादेवरी चाल केली. त्याजउपरी शाहाजी राजे याणि पातशहीन बायकास किले माहुली नजदिक कल्याण भीवडी कोकणांत थोर किल्ला पाहुन फौज घेऊन किबळे सुधा तेथे गेलें. लुखजी जाधवराव याणि मोगलांची फौज उतरेकडील घेऊन पाठि लागलें. नला माहुळीस जाऊन वेढाघातलें. साहा महिने भांडत होते. याजवरी शाहाजीराजे याणि विजयापुरच्या पातशाहास अर्ज व वकील पाटुन लिहिले जे "आपणावर दिलिची पातशाहाची मोहिम जाली आहे. सासरे जाधवराव याणि दखेली फौज घेऊन आले. घरची फितवा आपण केलि. माहुली बळकडुन बसलो आहा पातशाहा कौल त्याजवरुन पाट्वुन देतील. दौलत मनसब विशषे देतील तरी आपण फौज सुधा चाकरीस एउन यैसी अर्जी पाठवीली. त्याजरुन विजयापुराचे राज्यानी मरार जंग देवराव दिवान पातशाहाहि याणि कैल व इनाम पाठविले. त्याजवरुण शाहाजी राजे पांच हजार फौजे निसीं सासरे जाधवराव याच्या मोरच्या मारुन रातोरात जीजाऊ व संभाजी पुत्र देखील विजयपुराच्या राखे चालीले. जीजाई गरोदर होती. सातमाख्याची सिवाजी राजेयाचे वेळस दोनी तीने कोश पाटऊन गेली. मार्गी जातां घोडयावर बसेवनासेजालें. शाहाजा राजे यांसी संकट पडले. तेव्हा शंभर स्वार जीजाउ जवळ ठेवीले आणी संभाजी राजे वडिल पुत्रासभागमे घेऊन गेले. ते समई जीजाऊसी बोलीले जें "तुमचे पिता मागे आमचा पाढि लाग करुन येतात त्यास तुमची काहि शरम असलीयां तरी

सोडुन देतील अम्हास तुम्ही गरज नाहिं" ऐसे म्हणौन पळुन गेले. रात्रीचे ठाई तेथच लुकजी जाधवराव याणी सावधकरुन मदतास हती वरकडुन अपण होशेल होऊन पाहटिलागले. तो मार्गी जीजाऊ उभिराहिली. सिपाईस जाधवरावा वलखीली समागमे लोकानी जाधवरायसी बहुत फजीता केले. जीजाऊ तुम्ही कन्या आहे तांव्रास जाहेर केले म्हनुन उतम नाहिं. तुमची दाणे दाराने निघुन गेला-जीजाउस वाटे वेगळे काहाडुन देणे-मग त्याणि जीजाउ समागमे पांचसहे ५०० स्वारां देऊन सिवनेरी किला निजामशाही शाहाजी राजे याजकडें होता तेथे जीजाऊस ठेविली. सिवनेरी गडावर श्री भवानी सिवाई होती - तीस पुत्र व्हावें म्हाणुन जाऊन नवस केलें कि अपणास पुत्र जाहालेतर तुझे नाव ठेवीन. त्याउपरी सिवाजीराजे योचे जन्म जाहालें शके ११४९ चवदासे येकुण पनास क्षेय नायसंवरछर वैशाख शुद्ध पक्षी जेन्मजाले. इकडे जाधवरावा तांव्राची फौज घेऊन नगर पावेतो पाटीवाला. परंतु शाहाजी राजे जाडुन विज्यापुरास गेले. पातशाहानी माराजंग देवराव दिवाणयांसी पुढे सोमोर पाटवुन आघरे करुन घेऊन गेले. पातशाहा सुलतान सिकंद्र यांची भेटी जालि. बहुत सन्मान केला. घोड व हती सिरोपरन देऊन बारा हजार घोड्यांची मनसब दिल्हा. ज्यागीर कनटे प्रांत व स्वदेशी दिल्ही. या उपरी लुखजी जाधवराव व मरिजुमला सुभे फौजे सुधा माघेरे गेला जाधवराव नर्मदा पावतो जाऊन सर्व मंडली दक्षण्याच्या सरुकस ते होऊन जाधवराव वगैरे सरदार सिदखेड्यास दाखल जाले. या उपरी किल्ले माहुलास पातशाहाचे पुत्र व बयाका त्या त्या घेऊन सांभाजी अनंत मुछदि किल्ले दौलताबादेस आलें. दिवाण वजीर नाहिं यास्तव शोघ करीतां मालिकांवर चचींसखान दोघ होते. चोंग खान कमाल्या नंतर मालीकआवर याजवरी नजर पडली. पातशाहां पाहांताचीं चिन्ह उत्तम देखीली. पाई पैजमे शाम वर्ण दफसी फकीर ने लाजर देखीला. सेवकास सांगोन जागे करुन उमपद्या घरास नले. अभ्यगं करुन भोजनास घाळुन उत्तम वस्त्रे अळंकार देऊन एकांती त्यासी भाषणादी केळे. कीया शेपत जाला. पातशाहा याचे बाइकांचे. भोटिस घेऊन गेले. पातशाहाची मुले मांडिवर बसविली. तरवावर घेऊन हावल शाहारांत घवंडी फीरविली. कुल उमराव देखील जाधवराव येऊन मुलाळीमत जाली पातशाहाचे कामास बंदोबस्त केली, त्याज उपरी मीरजुमला सुभा

दिलीहुन मागती फौज घेउन आला. त्यो फौजेस बरवणापुर नजदिक असे. तेथे लढाई जाली. दिलीचें फौज कुच करुन नर्मदा पार करुन दिल्ही मालीकआंबर यांस बाहुत जखपमा लागलाया. फते करुन दौलताबादेस आलें. मालीकआंभर योची सिक्कीयातील नावक्षेर विस २० फारसीकरुन बंधे दरगाहा बरगाहा मलिकआंबार त्रिजीखाना एकुन अक्षेरवीस त्या प्रमाणे होती. त्याउपरी मालीकांबार फौज घेउन विजयापुर प्रांती श्री माहादेवल बासवाडा पोवतो गेले. घाम छुन केली साटी हाजार फौज होती. मुरारजेंग देवराव शाहाजीराजे व फरज्याखान व थोरले रणमुलाखान ऐसे तमाम सरदार कुल ऐसी ८०००० हजार फौज मराठे व व देक्षीणीयाणी पटे व सील समागमे गादी फौज इत्यायी केली. मालीकांबर यांची मोकवीला केला. मालीकाचे मोड जाहाले. पळत भिमातीरास मौजे कार गाव नंजदिक तेल गाव समसेरी याचे येथे आल. तो भिमेस पुर आला. उतार नाहिं मालिकांबरास संकठ पडला. ते समई घोड्याकाले उतरोन भिमेस नमस्कार केला. तो कमजाहाली. कुल लष्कर उतराने पार गेले. मग मालीकांबर आपण स्वार होडुन पले तीरास गेलें. जातांच भीमेस पुरचालीळा त्याजवरी मरारजेग देवराव फौजेनीसीं मागहुन तो भिमेस पुर धाहुन कौतुक वाटला. मालीकआंबरास सांगोन पाठविले जे "तुमचे पाठि वरी यावे तरी पुरवहुत भिमेस तुम्हासमात्रा मार्ग दिलहा त्यास तुम्ही पैलतीरीं उभे राहाणे. अम्ही येथुन तुम्हास कुरनीशात करु" त्या उपरी मलीक उभे राहुन होते. समस्तानी मुजरा केले. थोर वलीजीत पीर यासी उत्तर दिल्हा. मग मालीकांबर दौलतेबादेस गेले. दुसरी यांणे फौज सुधा भातोडितले गाव नंजदिक नगर तेथे येऊन विजयापुरकराची फौज सहिली. तेन्ह मालीकअंबर जऊन रात्री तले फोडु किले फौज बुडाविली. बाटाबज्यार व सरज्याखान तमाम धरुन नलें. माग तीसीरो पाठ देउन व घोडे हकुमा सोडुन दिलहें ते समई शाहाजी रराजे कर्नाटिक प्रतांती होते. तेव्हा मालीकाचे फते जाली. विजयापुर कराची कुल फौज बुडिविलि. त्याउपरी मुरार जगें देवराव कुल भौज सह वर्तमान मौजे नागर गाव तळके सांडस प्रांत पुणे भीमा ईद्रायणी संगमी दक्षीण वाहिणी तेथे जाते समई मुकाम केले शेकफाते जाली म्हणुन शक शालीबाहान १५५६ पंधरासे छेपन्न श्रीमुख नामसयछर दक्षणायण वरुष रुतु

भाद्रपद वद्ये ३० अमावश्या सुर्यै ग्रहाणे सोमवारी थोर पर्व पाहुन तुळा पुरुष सुमार २४ चोवीस करुन तुळा केल्या सिवेसी छावा हती बसावयाचे होता. त्याची तुळा करावयास हुकुन जाला. ते समई सज्र्याखान व रणदुलाखान वगैरे कोणाचीहि नजर चाले ना ते समई शाहाजी राजे याणि विनंती केली जे " तुम्ही खानकरावे आपण हतीची तुळाकरीतो. त्या उपरी शाहाजी राजे याणी संगमा खाले भीमास डोह होता. तेथे जाऊन मोटी नावा रिकामे करुन पाण्यात घालुन तख्ते देऊन हती नावेंत घातला. ते जे पर्येंत पाणि आले तेथें खाणु नावेस केलि. मग हती काहडुन लोखंड व दगड घालुन अमंड बाघीलें. मग दगड लोकंड काहाडुन तुळा करुन सोने ब्रम्हणास दिल्हें. धर्म केले. ते समई मौजे नागीर गाव काडुण तुलापुर नाव ठेविला. ब्रम्हणस अग्रहार दिल्हें. अध्याप गाव पुर्ते कुल बाब देखील सदर देशमुखी वतन ब्रम्हाणास आग्रहार चालत आहे. त्या उपरी पुणें येथे मोरो तानदेव देशपांडे हातो. भीमतीरी सुमेगीरी करीत होते साडे अडीत हामांतां मोरो तान देवाचा माउ होता. तो मावस करीत होता. त्या पुर्वा दक्षेणेस बारा हवासी येणे प्रमाणे किल्ला केला. शेक १२१६ बारासे सोळा खर नामसवछरे किल्ल तयार केला. मुलकअंघर नगरा पासोन ताहादवाई सीरकासे वेपुर देशमुलक कारुन पुढावे करीत असतां हाबसी शांत जाला. निजामशाहा याकडें होता. त्या उपरी शाहाजी राजे दिवाण जालें. ते समई किल्ल त्याजकडें जाला. मोटी गर्दी जालि. व गीरदि बहुताह जाली ते समई मोरो तान देव देशपोंड पुणेकर पुढेजाहाले. त्याज वरी राये राव दिवाण निस्वत मुरार जेगदेवराव याणी स्वार पाटऊन पालत आणौन रात्नीतुन धरुन आणिले. नखी सुया टोचुन मार देऊन कैद केले. पुण्यांतील कोरे पाडुन शहर मारीले. नागर पाढंरी वरधीक श्रीभुळेश्वर गड बांधीले. त्याचे नाव दौळत मगल टेविले. बहुत वैराणी मुळे मुलकाची वैराणी जाली. त्यास शाहाजी राजें याणी हतीची तुळा केली होती म्हणन मुरार जेंगदेव राव दिवाण मेहरबान होऊन कुल पुणे प्रांत जुनारे व चाकाण किला ताहाचवाई सिरपाल व सुपे इंदा पुर प्रांत जाहगिर दरोबस्त सिवाजी राजे यासी ते समई दिल्हे. राजेश्री दादाजी कोंडदेव कुलकर्णी जोसी हिगणी बोरडी व देऊळ गाव वगैरे तेथे होते मीरास लिहिणार होते. ऐसे जाणौन त्याच्या धीन कुल मुलुक समजुक केला. त्याउपरी

देऊन ठेविले. पागा हजार नर पांचेसे व माधवान पांचशे व सरदार बारगीर बगैरेसि दिदिले. त्यास तैनती कले. त्या उपरी मुरार जेंग देवराव विज्या पुरास गेले होता. त्याचें सभागमे शाहाजीराजे गेले. बाबाजो पंताचे खाधीन मुलक करुन जाते समई सांगीतलाकी "जीरंजीव व स्त्री सिवनेरे येथे आहेत. त्यास आपल्या पासी आणौन माहाल बांधुन देऊन उभयेतास अन्नवस्त्रें देणे. आणि तिरंजीवास शाहणा करणे". हि आज्ञा करुन राजे गेले. दादाजी पंतानी सिवनरीहुन जीजाउस व सिवा यांस आणौन पुणे वसउन लाहाण महाल बांधुन उभयेतांस खुशाळ ठेविले. वस्त्र अलंकारे देऊन आपले सनिधी ठेविली. त्याउपरी मोरो तान देव मौजे नागर गाव मनकरे प्रांत चाकण येथे बामन भटाचे पुत्र रंगभठ मानकरे यांची मातुश्री भुलाई होती. तीचे घारास रात्री येकांती गेले. त्याणी माडीवर गुप्त ठेविले. साहा महिने तेथे होते. तदनंतरे शाहाजी राजे विज्यापुर प्रांते कनकगेरी पाळेगार तेथे पाळेगार मावस होता. त्या किल्यास वेढा घातला होता. ते समई संभाजी वडील पुत्र होता सास जंबुरीयाचे गोळालागुन शांत जाले. पाळेगारी धरुन किला फते केला. त्याउपरी जाधवराव याचे रागे करुन आयले लग्न केले. राजे याणी मोहित्याचे कन्या तुका बाई केली. तीस पुत्र येकोजीराजे जाहले व जिजाउस पुत्र सिवाजीराजे जाहाले होतों. यांची त्याग केला. मुख पाहाणार नाहि म्हणुन बोलीले. दादाजी पंत पुण्यामधे मर्यादाने मर्जी करुन होते. सिवाजीराजे यासी पंतोजी ठेऊन तालीम खाना व घोडे फीरवणे यैसे तरबीयेत केले. दादाजी पंती मोरेतान देव देशपांडे यांसी कौल पाठऊन मौजे मनकरीहुन आणिविले. मुलुकास कौल बारा माडल उज्याड पडली होती तेथे देऊन वस्ती केली लांडगे जाहाले होते त्यास ताकीद करुन लांडगे मारीले. चोर नाहिसे केले. मुलुकांत उपद्रव केला मावले लोकास ताकीद केलीकी तुम्हास वतनाची गर्ज असलीयां तरी वस्ती करणें. मावले उतर केली कीं कौल जाहलियांवर त्याज प्रमाणे मुलुकाची अबदानी करु. त्याजवरुन दादाजी पंती कौल दिल्हा. बित तपसील खाले येणे प्रमाणे. पहिले साली दर बिगा. १. पहिले साली दर बिगा सुपारी येक ८३. दुसरे साली दर बिगा रुके तीन. ८६ तीसरे साली बिगा रुके साहा. ८७ चौथे साली दर बिगा रुके नौ. ०।, पांचवे

साली दर बिगे रुके पाव ०॥. ॥।. साहावे साली दर साली बिगे रुके सातवे साली दर बिगास येक टका घेतला. त्याजवर आठवे साली मांलीकां वरी जमाबंदी केली. मुलुक मामुर केला. मावस तमाम मारीले. इनसाफ बहुत करुन लागला. जो ते मुली दिधली होती ते कसबे खेडे बारा यथे सिवापुर पेटे ववसीली. पातशाहीं झाडे इरसाल वगैरे जीनसवार माहाराज राजेश्री सिवाजीराजे याचें नावे अबराई केली. स्त्री सुधा लोणची याची फोड स्वहास्ते घेवली. तेव्हा स्त्री विनोदे बोलीली की तुम्ही दुसरी यांची इनसाफ करितां आणि मी नसता लोणचे तुम्हास घयावयास केस आहे की कायें. त्यावरुन आपला हात तोडीवीत होते. मग लोकानी बहुत अर्जे राहावीले. तेव्हा दादाजी पंतानी मांगी यांची अस्तीनीकडे केली. हमेशा कड अस्तीनीच जागा अगांत घालीत असें. ते हे वर्तमान शाहाजी राजें यासी विहित जाहाले. त्याणी सीरोवाट पाटविले. ते समई कडी अस्तानी दुर केली. त्याउपरी सातसे होन वतन केलें. या खेरीज पीलेळते वाडी व पानसरे कोरांत जमा करावे ऐसी बहुत दिवस काम केले. शाहाजीराजे विज्यापुर प्रांतेंत होते. ते समई मुरारी जगदेव राव दिवाण होते. सुलतान सिकेंदर पातशाहा शांत जालें. मग पातशाईचे मुले लाहान होतें. बाईका बेगम होत्या. त्याणी मुरारजगेदवे दिवाणे मुजर्यास आणौन तरखा समीप जीवेमारावे तो त्यस कळले. तेव्हा तेथे मोठे जे होते त्यांचे श्नह करुन अनुसरसन्यासी जाले. मग त्याचे हात पायें तोडुन चवरण करुन मारीले. त्यानंतर विज्यापुरचे बंदतुटले. शाहाजीराजे फौज सुधां कर्नाटक प्रांती बाळापुर कोलहार तेथे होतें. बारा हजार फौजे होती. ते समई चंदावरी पाळेगार विजयराजे थोर होता. त्याचे स्त्रीयां पांचसे ५०० होत्या. मधरेचे राजा त्रीचेनापळीकराने होता त्यासी त्यानी निरंतर भांडत होते. शाहजी राजे यासी त्रेचेनायळीकराने अपले मददिस नेउन चंदावरकरासी युद्ध बहुत जालें. विज्येराघव रणी पडला. ते समई किले चंदावर स्थळे बळे घेतले. किल्यास साहा कोथाची फेर आहें. तो हास्तगत जाला. द्रव्ये तेथे बहुत सापडेल. तेथील कुल राज्य घेतलें त्रीचनायळीकर यासी राज्य घेउन द्यावे असे होते. परंतु त्यासी बेमानी करुन त्यास मारुन बाहर घातले तेहि राज्ये आपणेच घेतले, त्या स्थली पुत्र तुकाईचे पोटीचे येकोजी

राजे व त्याची स्त्री पिराबाई उपयेतां तेथे ठेऊन अपण बलापुर कोलराहा प्रांती माहाराज गडी होते. येकोजी राजेचे पोटि तीघेपुत्र होते त्याचे तपशील. १ वडील पुत्र शाहाजी याचे नकल कश्म १ शरफोजीराजे याचे नकल कन्लम १ तुकोजीराजे. सदरहु तीघे पैकी तुकोजीराजे यांची संतत आहे. त्या उपरी मलीकआंबर दौलताबादेस होते. ते मृत्यु पावले. देव्हा दिलीचा पातशाहानी मीरजुमला सुभा अवरंगजेब पुत्र पाठऊन दौलत बाद घेतली. मालीकांबर याणी पेटेस वेडली होती त्या पेठेंस गाव कोट बांधुन त्यानी आपले नावे अवरगाबाद ठेविलें. देक्षीणेचे सुभेदार गीरी केली. तेथे युध जाहाल. सर्जाखान याणी अवरगाबादेस माघारा सरले व सिकीस्त जाहालें. फीरुन अवरगाबादेस आले. बुरानपुर व खानदेशव वरडी अपलजपुर व खुजेस्थ बुनीयाद उर्फ अवरंगबाद येथीऊ तीनी सुभेयाची कारभार करुन लागला. त्याज उपरी दादाजी कोंडदेव याणी बंदोबस्त कारभार केला. येसें असता सिवाजी माहाराज दिवसों दिवस बलिष्ठा दशा ठाकुन बुधीचा प्रकाश करीत चालोलें. पांताचे कारभार उयानी न्याय निष्ठुर पातशाहि कामावरुन नजर आणी सिवाजी माहाराजाची प्रकारेलोक टेवावे व संचणी कंटावी. आपल्या मोखशाय खेरीज गात्र कारावें अबंडाव करावी पंतास न माने यास्तव किला वाहडली. त्याजवर पंतानी विचार केलाकी हा प्रकार बरा दिसत नाहिं म्हणौन पंतानी विष प्रयेे केला. त्या योगे दादाजी पंत मृत्यु पावले. तेसमई सिवाजी राजे सात वरुषाची होते. त्यानी बहुत शोक केला. त्या उपरी बहुत खजीना होता. शाहाजी राजे चेंदावर प्रांती होते. त्यानी दादाजी पंतास सागोंन पाठविल होते जे "अम्ही विज्यापुर प्रांती येउ ते मईस खजीना अम्हाकडे पाठउ देणें. जोवर अम्ही येउ तो पर्येत अपणा जवाळ असोंदणें" त्यास दादाजी पंत वारतांच खजीना सिवाजी राजे याणी जप्फ केले. सिबंदिस अज्ञान दिलहि. व हाजुर पाठविले. अपण पंचेवीस हजार मावळे लोक नवे ठेविले. कुल बंदास्त केली. स्वराज्ये नीलकंट फारसीनीविस चेतुर व सुरतपाक बहुत होते. त्यास पेशवाई सांगीतली. राघोबा चिट्नवीस नीठ लिहणार पाहुन ठेविले. रघुनाथ बषाळ लषकरचे सबनीस केले. नवे लोकासकाहि पुण्या मार्धे होते. सिपाइ बहुत मदुर्मीस आधीक होतें. शाहाजी राजे यास विदितया जाले. समाधानाच्या सनदा

पुत्रास लिहुन पाठविली. सिवाजी राजे याणि अमल बसऊन बंदोबस्त करुन पुणीयांत होते. त्याउपरी अवरंगजेबचे व सिवाजी राजे यांचे दावा लागावयास कारण जे. शाहाजीचे पातशाहा दिलीस पातशाई करीत होता. त्याचे कन्या बेगम अवरंगजेबची भगीणी येका होती तीजवर बळात्कार पापकर्मे केले. मग बहिणीर्णे भावास सांगोन पाठविली जे. पातशाहाची नजर फिरुन तुम्ही चाले करुन पातशाहि घेर्गे" त्याउपरी दक्षेणेची खजीना हाजुर दिलिस पाठविली नहोता. तो खर्च करुन फौजबंधी केली. तमाम लोकास कौले पाठविले. तेसमई सिवाजीराजे यांस परवाणा पाठविला. त्याणी मनास आणीला तो तेथील मजकुर की "तुम्ही फौज सुधा येणे अगर तुमचे येणे होत नसले तर सामराजपंत दिवाण याज बाराबर फौज देऊन पाठवर्णे. अम्हास दिली पातशाई आली म्हणीजे दौलत मनसब देऊ "यैसा परवाणा पाठविला." त्यास सिवाजी राजे म्हणौन लागलाकीं "तुरकास सलाम करणे हे उत्तम नाहिं. सामराजचंताचे दासीचे सिव्य प्रप्त होणार नहिं परवान्ना श्वानाचा पुछयासी बांधुन गावांत फोरविला. आणी यास धके देऊन बाहेर घातले. त्याणी जाऊन अवरंगबादास वर्तमान सांगीतले. तेच गोष्टी चितांत बैसली दिली फतेः जाहाली. यावर दक्षणेस मोहिम आधी सिवाजीराजे याजवर करु. तधी पासुन अजीपर्येंत चालील्या त्या उपरी अवरंगजेब दिलीस गेले. युध केला. उदाराम देशमुख ठार पाडला. त्याची स्त्री रायेबेगम तीने युध बहुत केली· फते जलि. प्रांत शहर सरकार देश मुखाची परवाना करुन तीस दिल्हा. दाराशाः व शुज्या अतशाः व मुराद दक्षणेस तीघे भाउ मारुन बापास कैद केला. ढोळे सिवले. किला भावाचे स्वाधीन केला. अवरंगजेब पातशाहा जाले. ते समई सिवाजीराजे याणि निराजी नीलखंठ राव निजामशाईचा चाकार वतनी आधिक्र वाडि किले पुरंधर येथे होते. किला बळकाऊन भोवाते मुलुक लुटुन खडणी घेत होते. ईनाम शेत गावो गांव होती. शाहाजी राजे यांची व त्यांची भाउपणा विशेष होता. त्याजवरुन सिवाजीराजे याणि त्यास पत्र लिहिले जें "दादाजीपंत अम्हास वडील होते ते शांत जाले. आपणास अश्व नहिं याचकरीतां गड राजमाचीस राहावेंया करीतां येतो." त्याणी उत्तर दिल्हेर्लें "अमचा दुसरा विचार नाहि. सुखरुप येऊन राहणे" असे उत्तर येतांच गडा खाले जाऊन छत्रणीस पांचहजार

पागा व मावले लोक पंचेवीस हजार घेऊन राहिले. गडा खाले पाउसाळा कर्मीला त्याउपरी दीपावळी सण आला. नीराजी नीळकंठ राव यासी धाकटा बंधु दोघे. पीराजी नीलखंठ व शंकराजी नीलकंठ राव. किल्याचे व परगणे याची कारभार करीत होते. धाकट्या भावास अन्न वस्त्र देऊन येके स्थळी ठेवित होते. तेन्हा धाकटे भावनी येकांती जाऊन सिवाजी राजे यासी भेटुन अनुसंधान लाविले होते. त्यास दीपवळी सणा बदल जीजाऊ व माहाराजास भोजनेस सांगावे म्हणुन वडिलानी धाकट्या भावास पाठविले. त्याणी येऊन अमत्रण सांगीतले. त्यासी उत्तर केले. लोकास टाकुन अम्हास येतां नाही तुमचेच आहो म्हणौन फीरोन पाठविले. अमत्रण घेतले नाहि मग ते तिघे भावानी विचार केला कीं शाहाजी राजे याच व व अपला घरोब त्याची स्त्री व पुत्र येथे असतांहि पाठवीलीया खेरीज करावी हे आपणास उचीत नाहिं. या करीतां मागतीये भाऊ उभयतां भावास पाठविले. की जीनाऊ व सिवाजी राजे व मावले लोक वगैरे सरदार व कारकुना सहवर्तमान कुल समुदाव घेऊन यावें. परवानगी देऊव समस्तास गडावरी घेऊन केले. ते दिवसी अभोंग श्नान व भोजन व वस्त्रे भुशेण दिल्ही. द्वीतीयेस भाऊबीज करुन बोलावणे करावी यैसे होते. ते दिवसी भोजन जाहली. रात्री जाणार होते. तो पाहाटे च्यार घटिकावर रात्री राहता पिलाजी नीलकंठराव व शेकराजी नीलकंट राव याणी उभयेतानी येऊन सिवाजी राजे यासी सावध केले. आगोधर सावध होते. तेच समई नीराजी नीलकंट राव याचे पलगा खाले भाहाडणी घाळुन त्याची स्त्री कामी म्हणौन होती, तीला येकी कडे काहडुन मशारनीलेस बंदिले. पाई बेडि घातलीयां त्यास गडयाचे दरवाजार मावले लोक पाठऊन जागा जागी चववया पाठविल्या. त्याचे लोक तीनहाजर होते. तेहिं हुजारांत होते ते कबील सुधा वगळे काहडुन दिल्हे. ते समई गडावर पावलदार बाजी व अंब्राजी रंगनाथ मलकेर व संबाजीस पांच हजार मावले नेहिमी ठेवीले. नीलकंटरावयाकडील खजीना मता घेऊन त्यास तीने रोज कैदेंत ठेऊन मग त्यास मौजे चद्रळी ईनाम देऊन त्याची वस्ती ववस्तभाव नगडे कुडेन घेतलें त्यास भौज मजकुरी ठेविले अध्यापी याचे वतन नाईक वाडी यांचे चालत आहे- प्रथम पुरधंर घेतला. त्याउपरी कसबे सुपे येथे

शाहाजी राजे यांचे मेहुणे तुको बाईचा बंधु होते. त्याचे भेटीस जाऊन त्यास कैद केले. त्याची पागा तीनींसें ३०० व द्रव्य घेतले. तेथे टाणा आपले बसऊन मग त्यास सोडुन घिधले. त्यउपरी दादाजी पंताची होती तेथे फीरगोजी नरसाले हावालदार ठेऊन किला आपले स्वाधीन ठेविला व माहालाचे हावलदार कासीराम अप्रदेशपांडे सासवडकर यांसी सांगोन ठेविले. त्या उपरी राजगड व पद्मावती व संजीवीनी व सुवेला घेऊन त्याचे इमारती व राजगडी मोरोत्रीभीर्येबक पिंगळे प्रथम चाकरीस ठेविले. त्या उपरी सिंदीगड निजामशाई किला तोरण व प्रचंड घेतले. पातशाही खजीना होता. त्याची पालत आणौन बरडी पाटऊन खजीना लुटुन आणीली. दोनी लक्षें होन पोल्यास दाखल केले. सभराज्यास पेशवाई दिलहि. हे खबर विज्यापुर पातशाहास पोहोचली. त्याजवरुन पातशाहानी कौल दिलहा. नवा जीला आणि लीहिलेजे "तुम्ही पातशाही चाकर असोन मुलक मारीतां किले घोडा खजीन्ना लुटिता. हे उत्तम नाही बराजे जाले ते माफ असें परंतु तुम्ही हुजुर येणे-तुम्हास दौलत देऊन सरफराज करु "म्हमुणुन" लिहिले. त्याजवरुन हजुर जावे कीं न जावे यैसा विचार करीत माहालांत गेले तेसमई स्त्री ऐसे विचार पुसुन लागला जे. पातशाहानी कौल देऊन भेठिस बोलाविला आहे. त्यास जावे की न जावे. सईबाई उतर केले "अम्हा स्त्रीस पुसावे ऐसे नाहि. माहाराज काय समजोन पुसतां हे नकले" थोर थोर लोक मुछदी वगैरे आहे त्यास पुसावा. बायाकाची बुधी काहि कार्याची नाहि-स्त्री याची बुधी निध्य आहे. "तेव्हां माहाराज बोलीले की" "सत्येच परंतु स्त्री यात अंतर आहे स्त्री म्हणीजे घरचे प्रधान याज करीतां विचारीले" त्याजवरुन सई बाई बोलीलीकी" महाराजाचे हुजुर वडील आहेत माहाराजाहि पातशाहाहि किल घेतले. खजीना लुटुले मुलुक मारीला. याज करीतां हजुर जावे हे सलाह नाहि. वडिलाना द्रष्टी देऊन जाहल तेव्हा बरे कैसेदि सेल राज्य मेळवणे असेल तरी श्रीस शरण जावे. ज्यास राज्य करणे असेल त्यास माहे कैंचा कमरेस पुढे होणेच होईल" हे आईकोन माहाराज परम संतोष होऊन उचीत द्यावयास पाहातां शाहाजीराजे याणी कर्नाटक प्रांतींहुन पोवळी याचो पलंग व बाजा चौलक्षा होनाची वजीर बखेर व ठाणा व फीरंग तारवा वरुन जलमार्गे पाठविली

होती. त्यज पैकी बहुत संतोष होऊन कमर बांधुन नीलकंठदेव यास मुजुमु दिल्हा. पायेलोकाची व फौजेची जमाव करुन जागा जाग सिकारी कारीया करुन पैका मेळवावे. लोकास कलुन ध्यावे. ऐसे करीतां बंदोबस्त केली. राज्यास अवळात घालीत चालिले. सोडकर व मोडवलीकर व नंजीरकर व राजपुरकर या लोकानी तमाम पत्र पाठविले की माहाराज कोंकणांत आलीयावर अपण भेटिस येतो. यानंतर माहाराज कोंकणांत उतरले सोडीकर व मोडिकर हे उभयते भेठले. तळे घोसल या ठिकाणी त्यासी कौल दिल्हा. भेटले उपर सुरताडी किला बसवीला. जागा जागा ठाणी बसऊन सिवपुरास केला. माहाराज्यासी कारभार सांगीतला. भोरडी समीप दोनी किल्लाचे खबर दारी सांगीतले. निराजीपंतास डबिरीहि दिदले. तदनतरे विजयपुराहुन सातसे बारगीराचा चाकार व्हावयास आले. त्यास माहाराज योजीले जे अम्हा जवळ काये आहे. यासी कैसे करावे हे ऐकोन गोमाजी बोलिला जे "माहाराजास राज्य करणे आहे. साप उत्तर कैसे देता त्याची मुद मनास आणुन त्याचे कबील कोठ आहेत त्याची चवलसी करुन उतरे देणे "ते त्यावे" आम्हाजवळ काय म्हणौन मग तो हे राज्यनीति नव्हे माहाराजास काये कंमी आहे सदरा कारकुन बोलीला. आणी विचार करुन लागला. मग ताटकीयासी उत्तर देणे नकरावे. त्याजवरुन सदर कारकुन व सरदार बोलाउन आणवीले. विचार करुन बारगीरीचा कबुल विज्यापुर, हुन आणुन त्यास चाकर ठेविले. राधोबलाल अंर्ग यासी सुभा सांगोन त्याचा स्वाधीन बारगीर केले. निलासोले देव व मजुमुदारयासी मुलुकगीरीचा सुभासांगीतला. त्याणी मुलक कौल देऊन रयेतास अबद करुन सुखीकेले त्याउपरी पायलोक जमा केला. माळु सरंढे माल पासलकर व निंबळकर मावळे धाटगे जगध्र पाधुन व लकन पानकर गुजर वगैरे लोक यांसी सांगोन विचार करुन अवठा पठा दोन किल्ले घेतले. त्याजवर नरहर अनंद रायास पेशवाई दिली. त्याउपरी राजगडास इमारत तयार जाहांली. यांनतरे मुख्य तेथे राहुन लागले. त्याउपरी राजगडास व सुवेलेस इमारत तयार जाहाली यानंतर मुख्य तेथे राहुन लागले. त्याउपरी च्यालीस हजार मावळे ठेविले बारा भावलचे राजे चदरराव मोरे जावलीकर विज्यापुराच्या पातशाहास खंडणी दर साल देऊन होते. त्याची दिवाण हनुमंतराव मोर होता. कुल कार

भार करीत असे. चाळीस मावळे याचा सरदार जावली नजीक माहबलेश्वर येथे राहत होते. चंदरराव मोरे यांची कन्या सुंदर उपवर होती. तीचे सोइरीकि बदल रघुनाथ बलाल सबनीस यासी हनुमंतराव मोरे याजकडे सिष्टहिस पाठविले. त्याच्य राणांत झाडी बहुत याज करीतां रघुनाथ बलाळ याचे समागमे पंचेवीस स्वार व शंभार मावळे देऊन रवान केले. हनुमंत राव मोरे अंगणांत उतरुन भेठिस खाले आले. भेठ होतांच दंगाकरुन कठाराने मारीले. बरावर दाहा विस लोक होते. तेहि मारीले. आणी वाई हुन रातोरात पुरंदरेस आले. राजे बहुत संतोष जाहले. सीरपाव दिलहे. दुसरे दिवसी च्याळीस हजार मावळे घेऊन रातोरात चालुन तिसरे दिवसी माहबलेश्वराहुन निशानीचे घाठे उतरुन जावळीस गेले. रघुनाथराव बळाल सबनीस याज सभागमे फौज देऊन हती तोंडचे घाटेंतुन उतरुन जावळीस आलें. वेढा घातला. दोनी प्रहर पर्यंत भांडणे जाहले. किल्ल घेतला. बाजीराव व कृष्णाजीराव मोरे यासी कबीले सुधा कैद केले. मालमत्ता द्रव्य बहुत सांपडले. पुरातन राजाचा भंग केला. मालमता घेऊन प्रतापगड वसविले. तेथे श्रीदेविचे स्थापना केली. मावळचे लोका चवकीस टेऊन उभयाता कृष्णाजी राव मोरे घेऊन पुण्यास आले. त्या समय करुन स्नान घालुन भोजनास घालुन पुण्याचे रक्षणेस निमजग्या जवल उभयतांचे सिरछेद केला. मोरे यांचे स्त्रीया व कन्या होत्या त्याची सोइरीक नकरीता सर्वत्रास सोडुन दिलही. चदंरराव मोरे जवली करयाचे राज्य या प्रकारे घतले. साठ हजार मावळे नाव जुनसहि केले. द्रव्य महुत सांपडले. जमा जाले. त्यउपरी मोईन काठ सोडवीला - किला घेतला. मवळे लोकांस कौल पाठाविले आंणी बोलाउन आणीले. गैरे मारठे मोरे येरुलकर यासी नाव सुभे मावळे सांगीतले. बखक्षीस दिलही. त्याउपरी जाऊन करयाण मारीले. अंबाजी सोनदेव याणी साराचे भठोप केला. मोगलयांची स्त्री सांपडल्ली होती. ती माहाराजास नजर केली. माहाराजानी उत्तर केले कि अऊ साहेबाचे स्वरुप ऐसे सुंदर असते तरी आम्ही या प्रमाणे जालो असतो असे बोलोन कन्या प्रमाणे वर्स्त्रे अलंकारे देऊन समागमे पांचेस स्वार देऊन बिज्यापुरास पोहचविली. मग येऊन रायगडी पहिला खुणा किला बंधीला. अंबजी पंती करयाणाची बंधोबस्त करुन मामलेचे उल येथे जाऊव शहर मारीले.

तेथे गुजर होते. त्याज पासुन बहुत मता घेतली तेथे मानोजी होता तो सांपडला. शहरास व मुलाकास कौल दिल्हा. हजुर आले. प्रधान गड घेतला. तेथे केशर रजपुत हाव्या होता. त्यानी जोहार केला. व कबीले मारीले. त्यांचे दोघे पुत्र वांचले. ते घेऊन केशर सिगांचा मातुश्री पलुन वर गेली. मुळे जातील म्हणुन राहिली. तदनंतर जुंज जाहालें. केशर सिंग पडला. किल्ल फत्ते जाहाले. माहाराज किल्यावरी चढोन गेले. ते मार्गी बोराची काटी पालखीस लागली तेव्हा माहाराज बोलीले जे "काठी अंम्हास काये सबब उभी करीती तरी इकडे खालेत खाणावे म्हणुन सांगीतेले. तो मालाचा चौक लागला. त्यांत अकबरी मोहरा व ज्यात्या सोन्याचा कांबी मिलोन बावीस घागरि व च्यार कड्या सांपडल्या. किलीयांची झाडा घेतला. केसर सिंगाची आई झांपडली. तीचा पायावरी डोई ठेविली. पालखींत घालुन खाले आलि. केसरी सिंग वगैरे रजपुत रणी पडले होते. त्यास आणुन अग्नी दिल्हा. कितेक दिवस त्याची आई व पुत्र स्वार व पायेलोक देऊन रवाना केले. गोर कर सावंत याणि जमाव करुन तेल घोसळे याचे मुलुक मारुन गेले ते समई माहाराजाचे शरिर सोस्त नव्हते. या करीतां हरी हरेश्वरास जाऊन वम्याची परिहार केल. तेथुन आलियावर कित्तेक दिवसी मागती हरिहरेश्वरास गेले. तेवेळेस गावांस आले तेथील सावंत भेटावयास आला. ते हस्तगत करुन त्याज पासी एक फिरंग चांगली होती. ती घेतेली. त्यास नावजन चाकरीस ठेविले. पालणकर राजे पलवी जाऊन पातशाईचा चाकर जाले. वरचेवर घाठकात किल्ल बांधीले. इमारतीस जागा जागा कामे लाविली. राजापुर मामले श्रीगंपुरकर सुर्वे यांसी तजवीजेने पळऊन देश व मुलुक हस्तगत केला. त्याजवरी कुंढण प्रांती स्वारीकरुन कुडाल नारो सांवत मोसले परागंदा करुन फिरगणात पळविले. तेथील मुलुकांचे बंदोबस्त करुन पोड्याचा कोठास आले. तो कोठ जोरावर म्हणऊंन त्यास सुरग लाऊन उडविला. व फते जाली. हे वर्तमान विज्यापुरास पातशहा होत त्याजेकड गेला. कर्नाटक प्रांती शाहाजी राजे त्यास पातयाहानी लिहिले. याणि उत्तर केले जे. आपण स्त्रीचे व पुत्रांची त्याग केला आहे. ते तुम्हास कळेल. तैसे पारपत्य करणे अमचे ऐकत नाहिं" त्या उपरी पातशाहानी अबदुला खानासहं बाराहजार फौजे

निर्सी रवाणा केला. तो बहुत दुष्ट होता. तुळजापुरी श्रीदेवीस त्यणे उपद्रव केला होता. त्याणे पैजाचा विडा घेऊन फौज सह वर्तमान वाईस अला. सिवाजीराजे प्रतापगडास जिजाउस घेऊन आले. साठ हजार मावळे अबदुल खान याणी आपला दिवाण कृष्णाजी भासकर माहाराजाकडे सिष्टाईस पाठविले जे " तुन्ही भेठिस येणे. तुम्हास दौलत शाहाजी राजे याने पक्षां विशेष देऊन पातशाहास भटवितो. विस्वास भेठिस येण. कृष्णाजी मास्कर याणी जाऊन भेठ देउन वर्तमान सांगीतले. त्यास माहाराजानी उत्तर केलेंजें " भेटि घेतां परंतु लस्करांत येत नाहि. प्रताप गडयाचा दरवाजी खाली बाहेर सदरी करीतो. तेथे खुध अबधुलखान व तुम्ही घेऊन वचन प्रमाणे हाती धरुन घेऊन जाणे. मग पातशाहाची भेठि घेऊन. आपणास काहि लरस्करांत येणे नाहिं. ऐसे बोलोन त्यास काहि वस्रे भुषणे देऊन घोड व सिरवाव दिल्हा. येकांती बैसोन शपत पुर्वक विचारीले जे. खान्याच्या चितांत काये आहे. त्याणी सविस्तार वर्तमान सांगीतलें. आणी बोलीले " जे अम्ही खानास घेऊन जावली येतो तेथे आले पाहिजे जैस पावेल तैशे करावे." 'या प्रमाणे बोलुन चालीले. त्या समागमे अपले तर्फेन वकीली संपताजी गोपीनाथ मौजे हिवरे नजीक सायवडी यासी समागमे देऊन रवना केले. उभयेता खानापासी वाईस आले. तेव्हा भेटिस जावे म्हणौन पंतानी बहुत परकर्मेरं समजाविले. तेव्हा भेटिस जावे यैसा निश्चेय जाहाला. हे वर्तमान संताजीपंती राज्यास लिहिले. जे " खान भेटिस येतात काय तर खुद करणे ती करावें " यैसे लिहिले. त्यावरुन गडच्या बुरजा खाली दरवाजीया संनीधगडकरी बालेदारास बोलावुन अणाजी रंगनाथ सबनीसास बोलाऊन त्यास सांगीतले जे सदर तयार करुन मखमली डेरे वगैरे सोनेरी कामे बिछाने तयार करविले. राजे साहेबी ब्रह्मणास बोलावुन द्रव्य दिल्हे कि कासीस जाऊन उतर कार्यें करणे. धर्म केला. गोधान दिदलें. मावळे लोक वगैरे जमाव करुन साठ हजार मावळे जागा जागा होते तेथे ठेऊन वाट मोकल्या राखिल्या. लोकास बोलिलेकी " अबदुलखान येत आहे. अम्ही त्याचे भेटिस जातो. तोफ तयार केल्या लोकास इशारत सांगीतली. खानास आपण मारु. ते समई गड करी किल्यावरी तोफाचे अवजा करीतील तेव्हा त्याचे लश्कर कुल बुडवावे. जो कौलास

येइल त्यास राखणे. वरकडि लश्कार जाऊन देणे" येणे प्रमाणे सरं जामी केली. अबदुल खानानी बुनगे व तोफा वाईस ठेऊन सडि फौज घेऊन व बेलदार झाडो तोडावयास समागमे घेतले. खडोंजी खोपडे रोहिडकर पांच हजार मावळे घेऊन मागे राहिले होते. त्यास बरोबर घेऊन प्रतापगडच्या रेखा चालीले. वाटेस हती निशानी याची गुंतला. चालेनासा जाला. तेंव्हा बहुतानी वर्जोले परंतु त्याणी ऐकीले नाहि. हातीचा डोले भोडीले. दुसुरे. हतीवर निशाण देऊन चालविले. झाडि तोडुन वाट करोत चालीले. रडि तोंडिचे घाठी उतरुन पारा जेवल कायजे तरी खारी मध्ये मुक्काम केला. तेथुन मागती कृष्णाजी भास्कर व पंताजी गोपिनाथ पाटविले कि लश्कारांत अथवा बाहेर तरी येऊन भेट घेणे. तेव्हाहि तेचे उत्तर केली कीं "सदरेस तुम्ही सडे येकट येणे. भेट होईल. हा निग्रह पाहुन अबदुल खान यानी अपला पुत्र फजल खान होता. त्यास लश्करांत ठेऊन आपण पालखींत बसुन स्वार जाला. भोई बतीस व खिजमतगार व कृष्णाजी भास्कर दिवाण व पंताजी गोपीनाथ राज्या कडिल ऐस पर्वत चडोन सदरे सनिध आले. अगोधर सदरेसमागमे राजश्रीनी मोटि गर्ता खाणुन टेविली होती. त्याज मधे बार करी असामी चाळीस सिवाजी व संभाजी व मावजी व बहिरोजी फर्जें दब सोन माहाला व जीवमाहाला वगैरे चाळीसे जणे ठेविले होते. त्याउपरी सिवाजी राजे याणी अंगात चालखत त्याजवरी दाख तावर व डोईस बाणे घालुन देव दर्शन घेतले. बीचवा हाती अस्त नीस्तक होता. पावा व नवा वांकी तरवार घेऊन मजबुदिने सर्व लोकास ताकीद करुन सावध केले. गडावरी बंदोबस्त केली. आऊसहिबाची पायें वरी डोई टेवुन अज्ञा घेतली. भातुश्रीनी विजई व्हावे म्हणोन असीर्वाद दिलहा. आणि सारे सरदार गुजर माहाडिक पालकर व नीराजीपंत व नीलोकंठपंत यासी सर्वांस सनिध नेमणुक करुन त्याची हाती माहाराजास दिलहे. जिजा माहाली यास दरवाजी यावर ठेविले आणि अपण गडा खाली उतरुन आले. तो पुर्वेकडुन खानहि आले. पालखी व बोई व खिजमतगार तीराचे खाचे वर मागे टाकुन खान व कृष्णाजि भास्कर उभयेतास दरवे दोन लोडा जवळ आले. पंताजी गोपिनाथ याणि पुढे जाऊन माहाराजास विनंती केलिजे "खान येऊन सदरेस बसले माहाराजानी मेढिस चालावें. तेव्हा विचवा व वागनख पट्टा व तरवार

1051



घेऊन खाना सोमोर येऊन उभे राहिले. तो खानानी कृष्णाजी भास्कर रासी पुसीले कीं सिवाजी राजे हेच कि काये" म्हणुन तीनी वेळे पुसले आणि बोलों लोग गले "तुम्ही पातशाई उमराव अपुन किले घेतां व मुलुक मारींता. खजीने लुटितां हे काये आहे". माहाराजानी उत्तर केलेकी "आपणच कोट घेतले. खजीना मोगलाने नेत होता तो अम्ही लुटुन सदराव जागे कले" खान वोलिले की अमचे किले घेतले आहे ते ते अमचा हवाला करणे "आणि तुम्हास पातशाहानी बोलिविले तरीं हजुर घेउन जाऊ". माहाराजानी उत्तर केलि कीं "पातशाहि परवाणे कोट आहेत" ते दखविल्यावरी हुकुम बरोंबर आहे". त्याजवरी खानाचे दिवाण बोलीलेकीं "हस्तपंज्या सिरि घेऊन तकसीर माफ करुन घेणे मग माहाराज बेलिलेजें" खान पातशाई चाकर. अम्हास माफ काये करीतील. बरे असो तत्रापी तुम्ही म्हणातरि अम्ही खानाचे पोटात डोई घालीतो. त्याणी तकसीर माफ करावी" यैसे बोलुन खानास भेटले. खानानी माहाराजास बगलेंत धरुन कठार चालविली. आगांत चिलखात होते. सबब मार गरजाला नाहिं. माहाराजानी आंग पिळुन बिचवा चालविला. आणि वाग नखाची मार डावे हाती केला. तो फेटेला बाहर एकेच बाहिर आला. अणि माहा राजानी आपणास सोडुन घेतले. खानाने पोट शाले बांधुन माहाराजा वरी पट्याचाहात चालविला. तोहि मार गरज न जाला वणे तुटुन गव्हा प्रभाणे लागले. त्याजवरी. माहाराजानी पट्याचा हात चालविला. खानाचे दोनी भाग केले. सेख पट्टाण जवळ होता. तो अडवा घावला. त्यास तान्हाजी मालुसीर याणी जवल करुन पाडिली. तो कृष्णाजी भास्कर याणी माहाराजा वरी हात टाकिला. राजे बोलीले 'की' "तु ब्रम्हण आहेस सोमोर उभा न राहाणे. ब्रम्हत्या घेडल" तो इरकीयांत भोयानिसा फीकरुन खानाची मुरघा पालखींत घालुन पळुन लागले. तो सदर मागे गरी मध्ये संभाजी व भावजी वगैरे धारकरी होते. गारीच्या तोंडावरी बसे होते. त्यानी गडबडा ऐकुन बाहेर निघाले. भोयांची मिच्ये केले. भोइ व खिजमतगार मारीलें. ते समईच पेटेंत पंताजी गोमिनाथ सांपडीले. दोन च्यार बार जाले. लोकानी वोळखीले नाहित. माहाराजानी त्यास रक्षीले. खानाचे मुरदा पालखींत होता. तो गडावर आविला. तुळजापुरी श्रीदेवीस उपद्रव केला होत म्हणौन लोखडीचा मेख

ताऊन गांडित मारीली. सिर कापुव दरवाज्यावरी बाधीले. तोफा सुटल्या. इशारत जाली. फते जाली. मावळे लोकास इशारात होती. ते लष्करांत उतरुन फौज बुडविली. आणि लुटमार केली. बाराहाजर घोडे पागास आले. निशावर व नौबत व हत्ती सरकारांत घेतले. अबदुल खानचा कबिला व पुत्र पळोन गेले. बाईस बुनगे टेविले होते. ते लुटुन गडावर आणिले. खंडोजी खोपडी रोहिलकर जीवे मारीले. मातुश्री जीजाउस भेटले. पंताजी गोपिनाथ यासी दोन लक्षे व्होन इनाम दिल्हा. वाहीवरे तर्फ केडे पावर प्रात पुणे नजीक साजवाडा हा गाव दिल्हा. आध्यापी त्याचा वंशातं चालत आहे. मोरोपंत पेशवे यांसी पेशवाई दिल्ही. रावजी पंतास राजापुरची सुभा होता त्याजपासी बाळाजी अवजी परभु शाणे लिहिणार पाहुन रावजी पंतास फडणीसी व चिट्णीसी सांगीतली. कागद पत्र होतात हुजुर जाऊन लागले. लिहिणार मजकुरावरी माहाराजासी संतोष जाले. ऐसे लिहीणार हुजुर असावा म्हणुन रावजी पंतास एक दोन वेळ लिहिले की "तुम्हाजवल ब्रम्हण व प्रभु लिहिणार कोण आहे तो हुजुर पाठऊन देणे." त्या उपरी माहाराजाची स्वारी राजपुर प्रांती गेली. तेव्हा रावजीपंत येऊन भेटले. ते समई समस्त बोलीले जे "इतुका लिहिणार अम्हास देणे." त्याजवरुन रावजी पंतानी बाळाजी आवजी आणुन माहाराजास भेटिविले. माहाराजानी त्यासी चिटनिस सांगीतले. घोडा सिरपा व बक्षीस देऊन राजकारणी कारभारांत लिहिण्यांत धड मोड्याच्या होते. ते काम घेऊलागला. बहुत संतोष जाला. अत राज कारणादिंक काम त्याचे देत घेत असें. सर्वा कारकुनास असो हे जाले ते द्वेष करुन लागले. कोणहिं प्रकारायाचा नाश व्हावे हे चीतांत आणिले. हि बातमी माहाराजास अंतस्ते कळली. त्याजवरुन माहाराजानी बाळाजी अवजीस ताकीद केली जे "कौणच विश्वास न धरावा कोटहि भोजनास गेला म्हणीजे तुमचा मुलाहिजा होणार नाहिं" ऐसे माहाराजानी सांगीतले हे वर्तमान सर्व कारकुनास कळली. यावरी एकत्र होऊन विचार केले कीं. त्याजवर माहाराजानी पुर्ण कृपा आहे. अपणा विरुध केलियां उत्तम नाहि. ऐसे सामजुन त्यासी सख्य करने पाहिजे. ऐसे पोतनीस सरदेशमुख मामले दारीस आले. तो माहाराजा पुढें काहि चालेना म्हणुन त्याणी राये बागीण कुमकेस बोलाविली. ती उंबर खडेच्या मार्गे येणार हे वर्तमान माहाराजास

जाहिर जाले. त्या उपरी उंबर खेडच्या मार्गे पांच हाजार बरकंदाजे टेऊन बंदा केला. राजे पाटिल व येशवंत राव व मामाजी विश्वास राव हातनुरकर दिनकर राव आलीबागराव यासी हुकुम केला जे "तुम्ही जाउन उंबरे खेडच्या मार्ग रायबार्गी येत आहे तीस तुमचे सरफराजी होईल. तो रायेबागीण उंबर खेडायास आली म्हणुन वर्तमान आले. तो याणि जाऊन उंबर खडयास सर्वत्रानी भोतरवळक लाविला. सर्व लश्कर बुडविले. रायबागीणे धरुन आणिली. बायको तीस काये कारावे म्हणुन वस्त्रे व जवाहेर देऊन अवरगाबादेस पोहंचवली. जामदर खाना याणी पळऊन जावे ऐसे विचार केला. तो माहाराजानी निराडोगर धरुन घाटे बंद केली. हे वर्तमान जामदार खानास दलपतराव याणी सांगीतले. तेव्हा तो नागोठणीयाच्या बंदरा वरुन पुण्याचे मार्गे तो कल्याणा वरुन गेला. कुल दक्षणेचा उमराव विज्यापुरी होते. त्यास दहशत पडली. माहाराजाचे येश बहुत वाडिले. किल्ले सातारा व चंदन वंदन व पनाळा वगैरे गड रहद विशाळगड व खलेणा व रांगणा व प्रसीधगड व भीमगड तहद सोंदे यांचे सरहदे पावेतो गड घेऊन खुद्द राजे पनाली यास राहिले. अबधुल खानाचे लेंक फाजल खान पळुन विज्यापुरास पातशहा पासी फकीर घेऊन गेला. पातशाहास अर्ज केला जे. आपल्या बापाची सूड घेतला पाहिजे. त्याजवरुन पातशाहानी कुल सरदार बोलाऊन ऐसी हजार फौज फजलखाना बरोबरी सिदी दिदला. यनी येऊन देऊन पनाळीयास वेढा घातला. माहाराज साट हजार मावळे घेऊन रात्रीच गडा खाली उतरोन मोर्चमारीत असे. तकडी ताजी गुजर जाऊन सरनौबती सांगीतली. कीतेक दिवस भांडत असतां पावनगडा खाले डोंगर होता. त्याजवरी तोफा चढऊन भारगीरी करुन लागले. तो मार किल्ल्यवर येऊन लागला. ते त्रिंबकजी नाईक ईगळे हावलदार म्हणुन लागलाकीं "माहाराजानी आता येथ राहुनये बाहेरुन उपराला करुन असावे" हे मसलत ऐकोन विसहजार मावळे ठेऊन च्याळीस हजार मावळे समागमे घेतले. आणी रात्रीस बाहेर निघोन मोर्चा मारुन चालिले. तीन गाव तेथुन विशाळगड राहिला. च्यार कोश पाई चालत गेले. प्रातःकाळ जाला. तो मोगलाचे फौजे रातो रात चेंद्रजोती लावुन माग वकाढित आले. खिडिकी जवल माहाराजास अठोपिले, ते समई भाजी राव प्रभु कुलकरणी हिरस मावळकर हारकरी हिमतीचा

होता. राजेश्रीस म्हणौन लागला जे " साहेबीनी हे लोक घेऊन जावे. मीहि लोक घेऊन येथे राहतो " यास खिडि चढु देत नहिं. माहाराज गडावरी पोहचल्या वरी तोफाचे अवाज करावे. तोंपर्येत त्यासी युध करुन फोज येउ देत नाहिं साहेब कामावरी पडीलों तरी मुला लेकराची अन्नवस्त्रांची बेगमी करणार माहाराज आहेत." ऐसे बोलोन निमे मावळे घेऊन खिडीजवळ उभा राहिला. युध मोठा जाहाला. सिदिदिलाल व अबदुल खानाचा लेंक फजल खान खिडी जवळ माघारे सरीले. दिड प्रहर पावतो खिडी चडु दिलही नाहि. तो माहाराज गडावर बोहचले. त्याणि दोनी तीनी अवाजा तोफाचा केले. हे ऐकुन बाजीप्रभु बहुत खुशाल जाहाला की अता जीवे गेला तरीहि चिंता नाहिं. त्याउपरी कानडे पयादे पुढे तोंडावरी येउन त्यानी मावळे लोकं खिडीतुन मारुन काडिले व पळुन लागले. ते समई हजार दोन हजार बारकरी व बाजी प्रभु उभे राहिले. युद्ध बहुत जाले. बाजीप्रभुस जखमा लागुन रणांत पडतांच मावळे पळाले. काहि सांबाळुन डोंगरांत गेले. फौज खिडी चडुन गडाखलीआलि. तो तेथे पाणी नाहि जागा कुबाल पाहुन दोनी च्यार घठिका उमेराहिलें व म्हणु लागलेजे या उपरी सिवाजी राजे सांपडत नाहिं येथें अम्ही पाण्यास राहिली याणे फौजा वरी छापा घाळुन फौज बुडवीतील ऐसा विचार करुन कुल फौज उठुन बिज्यापुरास गेली. माहाराजानी बाजीप्रभु व मावळे जखमी जाहाले होते. त्यास आणुन जखमा बरा केला. त्या दिवसा पासुन प्रभु वर मेहरबानी जाली. त्याचा पुत्रास बावजी प्रभुस जमीनसि सेनापतीची चा वतनी धंधा संगीतला. कुल जगाची कारखानाची वतन प्रभुस ते समई पासुन जाले. बिज्यापुरचे फौज जे पन्हाळा खाली मुलुक खराब केला होता. त्यास कौल दिलहा. राघोबलाल अत्रे सुभा सांगोन मुलकाची उस्तवरी केली. हि खबर दिली बा तशाहानी ऐकोन शस्ताखाना ऐसी हजार फौजेनीसी रवाना केला. तो मुलुक मारुन किल्ले घेतले. पुण्यांत राजवाड्यांत राहिला. माहाराज गडी होते. तेथे खबर आलि. तेंव्हा बहुत कोपायेमान जाले. विश्वासुक लोका समागमे घेऊन वाड्या वरी तीनिसे लोकानीसी गेलें. जाता वेळी बैलाच्या सिंगास व झाडास पोत बांदलें. सरकार कारकुनास हुकुम केली की "तुम्ही खबरदार राहणे-मोगलाची फौज आलि तरी जुमस न खाणे. सामराज पंता समागमे

बारा हाजार मावले देऊन पाठिवर कुमकेस ठेविले. माणी पुणेकर होता. फुलें नित्य शेस्ताखानास नेत असे. त्यांचे मेहुणा राजेश्री पासी होता. त्यच्या हातें भेद केला. त्यास पांचेसहे व्होन देऊन केले. लाल्माहालांत खिडिकी बागांत जावयाची होती. तेथे माळीयांचे धर होते. पांचहजार फौज येऊन अंतील वोहल तेथे स्वार व घोडे ठेऊन अंबराइतून जागा जागा मावले ठेऊन पाईमानी समागमे घेऊन खिडिकी समीप खुद येऊन पोंहचले. भाद्रपद मास पाऊस बहुत पडत होते. मधी रात्री ते समइ गाव कुसुची खिडिकी होती तो, उघडुन लालमाहालांत गेले. चौकीस खोज्या इलाल रोऊन पंचेवीस माणसे घेऊन जागत होता. तो मारीला. तेच माहालांत गेले. मालीयाने खाली शस्ताखानाची जेष्ट पुत्राची दाखविली. तेथे जाऊन राजश्रीनी येका धायेपत्याच्या हाते मारुन पुरा लोकास हलीस एके चुबकणी मारीतांच, तीनी सांगीतली जे "खानाचा पुत्र होये. मालीयाणे रात्री भुलोन पुत्राची खोली दाखविली". त्या सेजारी खुद शस्ताखान होता. त्याचे खोलिं कडें जातांच जागे होऊन सेतखानायांची भिंत, उडुन गेले. तो सिताबी करुन माहाराजानी घटिले. त्याजवर एके वार केला. अंगटि तुटेला. खबर चहुकडे जाली. वाध्य आवाज जाले. तेच राजेश्रीनी राहिले तो थोरल्या दरवाजीयां कडें हाती वरि चेंद्रजोती लाऊन हाती बाहेर होते. तेथे मावले लोकानी हातीच्या सोड तोडून बाहेर घेऊन घोडयावरी राजेश्री स्वार जाले. तो जागा जागा पोत होते ते उजवले. फौज तमाम तयार होऊन इलालावरी व झाडास पाते बांधीले होते. त्याजवरी दाऊ लागला. तो माहाराज रातोरात माघारे प्रातःकाळ होतांच राजगडास पोंहचलें. पाऊसा मध्ये. शस्ताखान पुत्राचे शोकास्तव पाठिलाग करुन राजगडा खाले येऊन फौज सहवर्तमान उभे राहिला. तो गडावरुन फिरुगी गोलादाज होता, त्याचीवाठे थापटुन अंबारी मध्ये गोलाठाकिला. तो अंबारी गोला लागून उडविली. हाती मागे श्वार होता. त्यास गोला लागून भोइमधे चिखलांत सवा गज गोला गेला - शस्ताखान वांचला. मग म्हणौन लागला जे "येथुन चालावें. मुकाम करावा तरी सिवाजीराजे आपणास मारीतील व फौज बुडवीतील". डोंगर फार आहें. तो मग

फौजेनिसी माघारे पुण्यास गेले. त्याउपरी पाउस लागला. कार्तीकमास जाला. मग ती गडावरी मोहिम केली. तो दिल्लीस पातशाहास वाके दाखल जाले जे. सिवाजीराजे याणी शस्ताखान याजवरी छवा धालुन पुत्र मारीला आणी अंगठो तोडिला. त्याजवरुन सुभांत गैरे होऊन हुजूर बोलाविले. मग शस्ताखान कुछ करुन दिल्लीस गेले. त्याजवरी विचारकरुन सुरत मारावी सरकारकून व सरदार व मावले आदे करुन जमात करुन सुरत मारीली. बहुत मता हातास लागला. सोन रुप मोती पोवळी या खेरीज दुसरा जिनस घेतला नाहिं. माहाराज तीकडे गेल्यां नंतर मागे बाजी सामराज विज्यापुराहुन फौज घेऊन माहली गौरे गाव पावतो आले. माहाराजानी सुरत मारुन माघारा आले. हे ऐकोन बाजीशामराज विज्यापुरास माघारे पळून गेला. माहाराजास एऊन दाखल जाहाले. तेथे घोज्याची पाहणी केलीं. पंतीजी पंतास फडनिसी सांगीतली. त्याजवरी नित्य मनास आणून धर्म न्याय चालावे ऐसे चित्तांत आणून ब्रह्मणांस वर्शासन दिल्हा. आणी अधिकारी पाहिजे म्हणौन रघुनाथभट यांस पंडित राइ सांगीतली. निराजी पंतास न्यायधीसी सांगीतली. कोंकण प्रांती अग्रहार दिल्ही. वारणासी पर्यंत धर्म कीर्ती जाली. त्याउपरी मुलुक गीरीस सुभेदार मजमुदारा नेमुन दिल्हे. ब्रह्मणास सुभा व प्रभूस मुजमु नेमिले. माहाले माहालाचे हावले प्रभूस व किल्याचे हावाले मरहाठीयांस व सबनीसी ब्रह्मणास सरनौबती मरहाटियास व कारखानी प्रभूस नेमून राज्य राज्यांची बंदोबस्ता केली. गडास दाहा राजपुतास एक नाईक तीघा नाईकास एक सरनौबत. त्यासी एक मशल दिल्ही. जेतिल तेथे बंदोबस्त केला. हाशाम लोकास सबनीस प्रभू व इमारतीस ब्रह्मण करुन दिल्हें. किल्यांच्या इमरती चालविल्या हिरोजी फरजद् यांसी कुल इमारतीची एतखेयारी दिल्ही. नागौजी फरंजदयासी सरदारी सांगीतले. ऐसे येकास एक कर्मे करुन ठेविले.

अवरंगशाहा पातशाहास खबर दाखल जाहाली. त्याणी दिलसि जाते समइ मोहकलासींग रजपुत दाहा हजार फौजेनीसी ठेविला होता.

त्यास हुकुम जालाकीं सिवाजी राजे याजवरी मोहिम करणे. यावरुन मोहकलासिंग चालोन नगरा अलिकडे आला. त्याजवरी माहाराजानी प्रतापराव गुजर सेनापती विसहजार फौज रवाणा केली. उभयताचे युद्ध जाले. मोहकला सिंग रणी पडला फौज बुडविली. दाहा हजार घोडे आणिले. फते जाली त्याउपरी राजेश्री रायगडास जाऊन लग्न केली. तीधी स्त्रीया केले. त्यास्थळी राहुन कोंकणातील किले व समुद्रांत बेटे होती ती बांधली. सुवर्ण दुर्ग व विजये दुर्ग व कुलबा व सीधोदुर्ग बांधुन राज्य फरीभोवांतले कुल किल्ले बांधीले. अरमार सजोन दर्या सागर त्याचे स्वाधीन आरमार केली. हबसी फिरगी इग्रज तमाम जैर केले. कोंकणांत तमाम जागे कल्याण भीवडी पासून फोंडे प्रांत गोवे सरहद घेतले. कोंकण कबीज केले. तमाम ठाणे बसवीली. त्याउपरी पातशाहानी मोहकलासींग बुडविल्याची वर्तमान ऐकोन मिर्जाराजा व जैसींग व राजाकर्ण व भावसींग असे तमाम रजपुत व देललखान बाविस सुभे दक्षणेस मोहिम केली. त्याणी एऊन प्रथम वेढा चाकणास घातले. नउ महिने मोरचे होती. फीरगोजीनरसाल हवालदार किले चाकण त्यानी तांत्रासी बहुत युद्ध केले. त्याची उपराला होईनासा जाला. राजेश्रीसी दीगडी होते. त्याउपरी त्यानी ईशान्ये कोनीचा बुरज त्यास सुरंग लावून उडविला. तीरसाखे देऊन पंधरा दिवस भांडला. मग तांत्रा मजकुराने फीरगोजी नरसला यासी कौल पाठविला. मग तो येऊन भेटला. नरसाली यास मनसब देत होता. परंतु त्याणे कबुल केलि नाहि. राजश्री स्वामीस येऊन भेटला. माहाराजानी नावा जुन नरसला मजकूरास भुपालगडाची हवाला सांगीतली. पुढे विचार पाहिला. तो माहाराजाची उत्कीर्ष बहुत दिसोन आला. त्यापुढें आपली बुध्री कि सिपाईगीरी चालावी ऐसें नाहि. हे चित्ता आणुन सख्य घडऊन भेटव्हावी म्हणौन जैसींग व मिर्जाराजा याणी गडावर हेजीब पाठविला जे तुम्ही अम्हास येऊन भेटणेस संशये कीमपी चित्तांत न धरणे तुंम्हास दिल्लीस नेऊन पातशाहाहिची भेटे करुन जाहागीर व याजखेरीज भिमे पासोन मुलुक दरोबस्ता इनाम व सरदेशमुखी गंगे पावेतो देऊन तुम्ही अम्ही एके भाउपणे दारोबस्त पूर्वीच आहे. इमान येकच घेऊन भेटिस यावें.

त्यावरी हे वर्तमान दलेल खानानास कळलि. यावरी बोलीलाजे तुम्ही व ते येक जाला तु-तेथे रागे कूचे करून किल्ले पुरंदरास येऊन मोर्चे नारायेणे घाठा कडोन चालविले. घारकर रुद्रमाले पवले डोंगर होता त्याजवरी तोफा चढऊन गडावर गोलेयतं ऐसा मार साधीला. मग माहाराजानी मीर्जाराज्याची विश्वास धरून त्याचे भेटिस आले. मीर्जाराजा सोमरे येऊन भेटि जाहाले. हती घोडा देऊन अलंकार सिरपा उत्तम दिल्हे वचनाप्रमाणे जाहेल जे दिलीस जाऊन पातशाहाची भेठी घ्यावि मुलुक घ्यावा हा तह जाला. मीर्जाराजाची पुत्र रामसींग समागमे जायावे. सिवाजीराजे व संभाजीराजे उभयतानी समागमे जावे. हा तह जाला. पुरंधराचे वेढा उठवावा म्हुणुन संगीतले त्याजवरुन त्याणी दलले खानास सांगून पाठविलेकी वेढा उठवणे तह मध्येये सतावीस किल्ले मीर्जाराज्यास दिल्हे त्यानी पातशाहास लेहुन पाठविले. आणि माहाराजास मनास आणीविली-माहाराजानी मीर्जाराज्यास सांगीतलेकीं "दंडराजपुरी निजामशाहा किलेदार बळकाउन वसले आहे. तुम्हास येऊन भेठेल नाहित". हवसी जवरदस्त आहे. त्याज वरून मीर्जाराजा यानी हाबसीस बोलाविले. त्यासी सिधा खैरीन व सिदिस अवदुळ व सिदियाखुव हुजुर येऊन भेटले. रुजु जाले. त्यासी हुकुम केलाकीं जंजीराखाली करुन सिवाजीराजे यांस देणे त्यानि उतर केलीकी किलेदार पातशाही हुकुमा खेरीज देत नाहिंत. त्याजवरुन हुजूर लिहिले आणी हुकुम आणवीली. परंतु आला नाहिं. हवसी यांसी ईजाफा सुरतेवर पातशाहाहि तनखा करुन दिल्हा. आणी नसरतशई व जाफरशाई जाहाले. व्होन व गुरावातीन व गलवेत पंचेवीस करवीली. आणि अरमाराची सुभासीदिस सांगीतला. अरमार व जंजीरे यासी सुरतेवरी दोन लक्षे रुपये दिल्हा. तेव्हा मीर्जाराज्यास माहाराज वोलीलेकी हुजुर पातशाहाहिची मुलाजमत जालीयावरी राजपुरी जाहागीर पातशाहा पासून देवणे-त्यजवरी मीर्जाराजायासी पातशाची' हुकुम ओला जे सिवाजीराजे यासी हुजर पाठवणे. मग मीर्जाराजा यानी अपुला पुत्र रामसींग हजार स्वारानीसी समागेमे दिल्हा. माहाराजानी रायगडी जीजाउ व मोरोपंत पेशवे आवाजी पंत सुरनीवस व लोसोन देव मुजमदार यास

व सरदार व पागा ठेऊन माहाराजानी संभाजीराजे पुत्र व प्रतापराव गुजर व नीराजी राउजी व त्रीयेंबक पंडित डबीर व रघुनाथ पंत मराटे व चीरोजी फरजंद व पांच हाजार मावले इतका समुधाये घेऊन दिलीस चालिले. पातशाहाचे हुकुम कुल फौजदारास व जमे दारास की सिवाजी राजे जेथे राहातील, त्यास जागा मेजवान्या करणें. ऐशा मेजवान्या खात दिलीस गेले. त्याउपरी मेटिस उभेयेता सिवाजीराजे व संभाजी राजे व मुतसहि घेऊन पातशहाचे मेटिस चालीले. अगोधर रामसींग याणी व नीराजीपंत सांगीतले जें पातशा मुजरा करावे म्हणुन कित्तेक प्रकार सांगीतले. मेटिस गेले तत्खसंनीद राजे जांतांच सलामं न करीतां राहिला. खान दिवाण पातशाहि त्याचे वरते जाऊन उगेच उमे राहिले. पातशाहानी रामसींगाकडे पाहिले. परंतु सलाम करणे चित्तांत नये. तुरकास सलामं करावा हे उत्तम नाहि हे चित्ता मधे एक पळफर उभे होते. पातशाहानी बरे नजराने सिवाजीराजे यासी पाहिले. रुमाल तोंडास लाऊन हसोंलागले. रामसींगाने अर्ज केलाकीं हे मराहाठे फाहर वेश माळुम नाहिं त्याजवरी हुकुम जालाकीं यासीं घेऊन जाणें. त्याजवर सिवाजी राजे पातशाहाकडें पाठे करून चालीले. लशकरांत डेरीयास आले. त्याउपरी दुसरे दिवसी पातशाहानी रामसींगास बोलाऊन म्हणाले जे "तुम्हीं सिवाजीराजे यास जामीन होण कतवा देणे. तुम्ही मुदा आणीला त्याप्रमाणे मुलुक व मानसब देऊनाहि तरीं पुत्रास येथे ठेवावे म्हणीजे त्यास आज्ञा देऊन" तेव्हा रामसींगाने उत्तर दिलहा की "अपण जामीन होत नाहिं त्यास मान देऊन आणिले आहे. त्यची चीराहा वेशदारी नाहि पुत्रास ठेवतीलतरी पुसोन पाहु. त्याउपरी रामसींग सिवाजीराजे यांकडे येऊन पुसले—त्याणीं उत्तर दिलहे की तुम्हीं जामीन होणे. अपण पुत्रास ठेवीतनाहिं उभयता येथच राहतो" ऐसे उत्तर राजश्रीनी दिलहें. याची विचार मनास आणुन रामसींग याणी पातशाहास विहित केले. शहरांत उत्तम थोर हवेली तत्खासंनीधे देणे. हुकुम होतांच सिवाजीराजे व संभाजीराजे व मुतसहि सहवर्तमान हवेलींत नेऊन ठेविले. तेच समई पातशाहानी तोफखानाची चौकी भोंवती बसविली. राजेश्रीनी रामसींगास आणुन फजीत केलीं की "तुम्ही

इमानी रजपुत केले. तुमचे अमचे इमान उत्तम. बरे जाहाले. ते उत्तम जाहाले. अतां अम्ही पातशाहासी उभयेता राहातो. प्रतापराव गुजर व मावळे लोकायासी पातशाही हसाल करुन देणे देशास जातील. त्याजवरुन रामसींग पातशाहासि अर्ज करुन हस्तक दिल्हा. प्रतापराव व मावले कुल लोक देशास रवाणा केले. आपण, व पुत्र व निराजीपंत व त्रीयेंबकपंत व रघुनाथपंत व हिरोजी फाजंद व खिजमतगार पालखीची भोई व घोडे दोन येणे प्रमाणे ठेऊन वरकड वाटे लावली. त्याउपरी बातशाहाची भेटें नाहिं रामसींगाकडु अर्ज करीविला की नजर आणीली आहे. पातशाहानी उत्तर दिल्हे माफ आहे. तुजे अर्ज करवीला की मनसबदारास व मुतसद्दियास कोंकण प्रांतीची मेवा आणीला आहे. त्याची हुकुम काये. पातशाहा बोली लेंकीं ज्यास देणे असल त्यास द्यावे. तेव्हा मेवामिठाई कावडितं घाळुन रोहिलखान दिवाण आधिकरुन मुतसद्दि याच बरोबर जात असता चैकीदारानी दोन च्यार वळे झाड घेतले. मग झाडे घेईनासे जोंल. ऐसे नित्य दोनमास ढौय्ळा जात असता कार्णे एके दिवसीं च्यार घठिका दिवस राहातां उभयेता पुत्र संदुकेंत बसुन दिल्ली बोहर देसच कुंभार होता त्याची हावली मोठी होती त्यासी हिरोजी फरंजद याणे अगोधर जाऊन इमान प्रमाणे केले होते. त्याच्या परसांत जाऊन फारंजद त्याचे डोईस चीरा व मोत्याची तुरा घाळुन निघालें होतें. माहडिवर जाऊन राहिले. जाते समइ मागुन दो घठिकानी चीरावडी ठेऊन आपली पांघुरुणे घेऊन निघोन गेला. चौकीदार खिडिकी झेरोख्यावाठे पाहात असतां साइकालीहि दिप दीसेनासेजाला पाहुलागले. तो सिवाजीराजे व संभाजीराजे नाहिंत. निराजी पंताचे बिहाड वगेळे होते. ते दिवसी तेहिबीरहाडी नाहिंत. चहुकडे पुकारा जाहाली. त्रीयेंबकपंत डबीर व रघुनाथपंत कोरडे उभयतां सांपडले. त्यास कैदेंत ठेविले. ऐसा दगा होऊन सिवाजी राजे पुत्रें सहवर्तमान निघोन गेले. त्याउपरी कुंभाराचे घरी एक मास गुप्त होता. पातशाहाहि फौज चहुकडोन शोदा बदल गेली. ती फीरोन आली शहरात दौंडि पिठवली पंधरा दिवस शोध केला. निवंत जाहाले दाढ्या डोया बोडुन

वैरागी समस्त जाले. निराजीपंत महंत जाले. त्यासी वैरागी भाषायेत होती. कासीच्या मार्गे जाऊन इंदूर प्रांते खंबरुन वरुन वेलघाठे चढून कडेवली तात एक गावी राहिले. ते गावी चीगुरे अनंदराव तैलंगराव याण्णी कुलनेली गावांची पाठिलीण वृची. तीस म्हणाले कीं राहावयास जागा देणे. ती म्हणुलागली जे गोठारी काम पडिला आहे गुरे कुल सिवाजीराजे याचे स्वारानी नेली. सेण सारावयास नाहिं. सिवाजी बंदिपडला. नाना प्रकारे सिवा देउं लागली. मनामधे सिवाजीराजे यानी निराजी पंताकडे पाहोन हसोंलागले तीचे नाव गावेंल हुन घेतले. तेथुनं रायगडाचा पाटिल प्रतापराव गुजर वगैरे गडास दिलीहुन रवाना केले होते. त्याणी येऊन जिजाऊस कुल वर्तयान दिलेचे निवेदन केले. सिवाजीराजे कैदेंत ठेविल आहें आपणास देशास पाठिविली हे वर्तमान ऐकतांच मातुश्रीनी वहुत शोक केला. त्याउपरी सिवाजीराजे व संमाजीराजे कैदेंतून निघाले. ते च्यार वर्ष कुल तीर्थकरुन उत्तरे-कडुन देशास आले. संभाजीराजे याच्यानें पाई चालवेना यास्तव काशी मध्ये नानाजी विसवासराव ब्रम्हण थोर कासीकर त्याज पासी विध्यार्थी पणे गुप्त टेविले. सिवाजीराजे पाचावाणाहुन रायगडास चालिले. निराजीपंत माहंत वरकड वैरागी कुंपिनीं कंथा डोईस ठोपी ऐसे गडावरो दरवाजीयास दाखल जाले. पुसुनलागलाकि "तुम्ही कोठुन आला". त्यास उत्तर दिलहे जे "उत्तर देशीहून अलों". अगोधर ताकीद होती कीं कोणीही आले म्हणीजे गोसावी अगर वैरागी जो असेल तो जीजाऊने नेऊन रुवरु खवर पुसावीं. त्यास झुंड जाताच दरवाजेकरी याणी खवर मातुश्रीस जाऊन सांगीतली — परवानगी देऊ नेले — मातुश्रीस निराजी पंती असीर्वाद केला. सिवाजीराजे मागे होते. त्याणी मातुश्रीच्या पायावरी डोइ ठेऊन मुक्यान हुंदका दाठला. वैरागी रुप होता मातुश्री म्हणौन लागलीकीं "वैरागी बावा तुम्हि पाया पडोन अम्हास पापांत घालीता". हे म्हणतांच कंथा ठेपी ठाकुन मांडीवरी जाऊन वसले. मांडिवरी बसतांच वोळखिले. गळा मीठि घाळुन वहुत शोक केला. त्याउपटी कासीचा घोदे आला. त्यासमागमे संभाजीराजे यासी मनाजी विस्वासराव घेऊन आले. लक्ष व्होन इनाम दिलहे. त्रीयेंबक्तपंत डबीर व रघुनाथपंत

करडे यासी पातशाहा बाजी सिरपा देऊन सोडिले. निराजीपंत व त्रीयेंबकपंत व रघुनाथपंत व बाजीराव फटिजंद यास लक्ष ऱ्होन एकेकास दिल्हे. या प्रमाणे सर्वमंडली दिल्लीहून आलि. त्या उपरी मीर्जाराजा यासी तहा मधे सत्तावीस किल्ले दिल्हेहोते ते माघारे घेतले. किल्यसि इमारती चालविल्या मीर्जाराजा व जैसींग याची तगीरी जाली. सबब सिवाजीराजे तुम्ही पाठविले. हा अन्याये ठेऊन हुजूर बोलाविले. मीर्जाराजा व जैसींग दिल्लीस गेले. दक्षणेस सुभा दलेल खान यास जाला. त्याणी येऊन पेडगावी छवणी केली. त्याउपरी माहाराजानी संभाजीराजे याजवर इतराजी केली. गडाखाली श्रींगार पुरी स्त्री सह्वर्तमाने ठेविले. तैनातीस पांच हजार मावले ठेवीले. माहा पंडित पढावयास संनिधे ठेविले होते. ऐसे असतां संभाजीराजे शकवंत होते. तेव्हा दलेलखान याजकडें राजकारणें करुन कील्ले आणुन स्त्रीसह वर्तमान दाहा स्वारानीसी श्रीदेवास जातो म्हणौन रातोरात पेडगावास गेले. समीप जातांच दलेलखान मोकासावर येऊन गेले. आदर बहुत केला. संभाजीराजे याणि दलेलखान कुलबावासी उमराव सहवर्तमान जाऊन भुपालगड घेतला. हरोळ आपण जाऊन उभे धावणेगड फते केला. गडकरीयाणी हात रोखीला. सिवाजीराजे याचे जेष्ट पुत्र राजेश्री इताराजी करतील म्हणौन भांडिले नाहिं. फीरगोजी निरसाला हवालदार व विहल भोलराव सबनीस पाठऊन राजश्री जवळ पनालीयास आले. भेठे होतांच फिरगोजी नरसाला ज्याला जुंजला नाहि ऐसे चांगली जातील म्हणुन तेचक्षणी फीरगोजी नरसाला यासी तोफाचे तोंडि दिलहा. विठेल भालेराव ब्रम्हण म्हणुन राज्यांतून काढून दिलहा. त्याउपरी संभाजीराजे याणी गडकरी मावले गडावरी होते ते त्याचे हातमान घेऊन सोडुन दिलहा. गड फतकेला. वरकड गडावर मोहिम करावी तरी राजे पनाळीयास बसले. फटिगोजी नरसाला मारीला. त्याजवरुन तमाम गडावर दहशत रसली. समस्त गड खबरदार जालें. त्याउपटी दलेल-खान जाऊन विज्यापुरास वेढाघातला. संभाजीराजे भेटावे म्हणुन हे वर्तमान दलेलखानास व वकेनीस याणी पातशाहास लहिले यावरुन पातशाहा आदी स्वार हुजुरचे पाठविले कीं संभाजीस हजुर पाठऊन देणे. दललेखान

पठाण ईमानी त्याणे रातोरात स्त्री सहवर्तमान बरोबर स्वार देऊन पळविले. संभाजीराजे येकेएकीं पनाळीया खाले आले. निशाण भगवे देखीले. सिवाजीराजे गडा खाले येऊन भेटले. च्यार घटका गळा मिठी घाळुन शोक केला. मग पनालाचे स्वाधीनकरुन राजेश्री रायगडास आले. त्याउपरी दलेलखान विजापूरास भांडत असतां अहदि फिरोन दिलीस गेले वाके दाखल जाले. हे ऐकोन पातशाहा ईतराज जाले. अहदि व गुरुजदार फिरुन प्याला देऊन पाठविले. दलेलखानाने हुकुमावरुन प्याला घेतला. संभाजीराजे पळविले म्हणून अन्याये ठेऊन खाना सारिखा माहेर मारीले. त्याउपरी दक्षेणेचे सुभा कुल येख्तीयारशाहा अलम वडील पुत्र शाहाजादा समागमे राजकारण व भावसींग व जैसींग वगैरे कुल रजपुत तैनात करुन अवरंगाबादेस पाठविले. माहाराजानी निराजी राऊजी वकील त्यासमागमे हुजुरचे कारकून अनाजी रंगनाथ मलेकर व येसाजी मल्हार वाईकर सुरुनीसाचे तर्फेन व प्रतापराव गुजर सरनाबत पांच हजार पागा देऊन त्याजकडे पाठविली. सताविस किले त्रीयेंबक वगैरे देऊन सलाह केला. तीनी वर्षे सलाह चालिला. मागती विघाड करुन प्रतापराव गुजर वगैरे पागा अगोदरच आले होता ते गंगा स्नानास म्हणुन निमित्यकरुन रायगडास अले. सतावीस किले मागती मोरोपंत याणि माला लाऊन घेतले. किले सरले. मोरोपंत होते त्याणी मालवणे व बगलाण कवीज केले. त्याउपरी सिवाजी राजे खुब फौज सहवर्तमान जाऊन सुरतेची पुरा मारला. मालमता बहुत सांपडीला. दिलीस पातशाहास पत्रलिहिले जे "तुमचा मामा शेस्ताखान त्यास मारीले व सुरत होती ती बदसुरत केली. फतशाही पुरातन तुमची नव्हे. दक्षणेंत तख्त पुरातन. निजामाशाहा पातशहाचे आहे. अम्ही वजीर कदिम निजाम-शाहाचे तुचे दक्षणेस काहि नाहि, आणि तुमची पातशाहसी नव्हे" ऐसे पत्र दिलीस पाठविले. त्यास उतर पातशहानी लिहिले नाहि. त्याउपरी दक्षण प्रांती सिवपनाईक बिदनुरकर पाळेगार थोर राज्य सेना बहुत जबरदस्ता होता. त्यास राजे साहेबी लिहीलेकीं अंम्हास खंडणी वरषास देत जाणे. त्याणी उतर दिल्हे जे तुम्हाजवळ होईल तरी झाडी बहुत जागा जोयवर देखोने मुहूर्त पाहून मोहिमास चालिले.

जाते समई राजाराम त्याचे मातुश्रीस रुतुप्राप्त जाला. तैसीच पालखीसी धरुन बरावर घेतली. पातशाहा दिवस समागमे होती. उपरांत माघारे जाऊन दिल्हि. तोच गर्भ राहिला राजाराम पुत्र जाले. तेच समई सिंधेदुर्ग व मालवत किला नजीक समुदर तीर तेथे जाऊन कुल अरमारा जाहाजे आणून मावले च्याळीस हजार घेऊन जाहाजांत बसुन जाऊन बसनुर पेठ नजीक समुदर तीरी गोकर्णमलेश्वर बंदर सिवपनाईकाचे होते ते मारीले. द्रव्य बहुत सांपडले. सावकार धरुन फते करुन रायगडास आले. त्याउपरी सिवपनाईक याणी पाठऊन तीनी लक्ष व्होन वरुषास देणे ऐस तह केला. उमापंडित हुजुरी ठविले. त्यादिवस्या पासून सिवपनाईकाची श्रहे चालीला. त्याउपरी कर्नठिकप्रांती शाहाजीराजे होते. त्याचे तैनातीस बाजी घोरपेड मुधनकर होते. सात फिडीया विज्यापूराच्य पातशाहाचे नौकर होता-पांच हजार फौजानीसी माहाराचे तैनातीस होते विज्यापूरची मुलुका वगैरे गड घेतले. अबदुलखान .... .... .... सिवाजीराजे यासी वलकीस पीचे जाताना मधुलकर घोरफडयासी सांगुन विचार घेऊन शाहाजीराजे यासी धरावे म्हणून सिवाजीराजे अपाणाचे भेंठीस येता विचारकरुन घोरपडयास सांगून त्याजवरुन बाजीघोरपडे याणी शाहाजीराजे याजसी मोजवानी बदल डेरीयास अणून कैद केले. हाती व घोडे कुल दौलत जप्त केली. अणि विज्यापूरास पातशाहास लेहुन पाठविले. पातशाहा खुष होऊन जलीबदार याजबरावर हुकुम पाठविलाकीं जमीनंत गार खाणुन चांदुन ठाकोंनस परवाना पाठविला. हे वर्तमान रणदुलाखान वजीर विसहजार फौजची सरदार थोर होते, त्याचे व शाहाजी माहाराजाची भाउपणा होता. त्यास विहित होतांच हिरवी लुगी करुन दिवटी घेऊन दिवसा पातशाहाचे मुजरेस गेले. पातशाहास म्हणुन लागला जे "आज मकेस जातो". पातशाहा धावरीजाले. जे कुल दखणी एक वाटजाले म्हणीजे पातशाहीस दगा महोइल. हे जाणुन रणदुलाखानयांसी हाती धरुन बसविले. आणी काये निमीत्य म्हणौन सलगेन पुसुंलागला. तेंम्हा पातशाहासमुदा जाहिर केला कीं सिवाजी राजे याच्या रागे शाहाजीराजे यासी मारावे हे, क़ाहिं कुराणी लिहिलेनाहिं बापा करीतों बाप पावे बेठा करीता बेठा पावे. ऐसी सत्खरद बदली

केली. पातशाहा खूष जालें. आणी बोलीले जे शाहाजी राजे यासी भेठिस घेऊन येणे. भेटून जातील. तुम्ही जामीन होण. त्यावरुन रणदुलाखान जामीन जाले. घोरपडीयास ताकीद घेतली. शाहाजीराजे यासी सोडुन देणे. अपला खुद जलिबादार परवाना देऊन पाठविला. त्यास रणदुलाखान याणी भारभार सोन ईनाम घ्यावे. शाहाजीराजे याची मुलाजमत जाली म्हणीजे देऊ. ऐसे बोलीले. त्याजवरी जलीबदार सत्वर पोहचला. अगोधर पातशाहाची जलिबदारापुडे पाहिला होता. परवाना जातांच पातशाहाहि हुकूमावर घोरपडेयानी शाहाजीराजे यांसी अभ्यगन करुन भोजनास घाळुन लश्करा बाहर गार ख्याणून गारीतं बसऊन माती ठाकीलि. आंत मालीगीतापटण करीत होते. हनवटी खाली चीप उभी केली वरती माती ठाकून घोंडे ठेऊन बुजवावे. तो मागील जिलीबदार दीमत रणदुलाखान पातशाहाइ परवाना घेऊन तेच समई पोहंचला. येतांच पातशाहिचे हुकूम देऊन त्यास बोहर काढुन स्थान करुन बराबरी घेऊन मजलदरमजल घोरपडे सहवर्तमान विजयपूरास आले. रणदुलाखान वगैरे वजीर सामोरे येऊन पातशाहि मुलाजमत करीवीलि. पातशाहा खूषहोऊन हाती व घोडे सिरपाव देऊन बख्क्षीस केले ते समई पातशाहाची आज्ञा घेऊन रणदुलाखन देखिल बाहेर आले. समस्त वजीरानी मेजवान्या केले. पंधरा दिवस मुक्काम होता. त्याउपरी चेंदावर प्रांती कर्नाटकांत गेले. मोहिमास यावे ऐसे करार रणदुलाखान याणे एकांती सांगीतला की घोरपडेयांची विश्वास न दरणे. या उपरी विजयपूरास यावे याचे जाले तरी पांच गावा वरुन मुजरा करीत जाणे. कोलार व बलापूर प्रांते रणदुलाखान होते. त्याची गुम ठेवा. अमराह हिमत पुरी अध्यापी आहे. त्या उपरी शाहाजी राजे याणि सिवाजी राजें यास सांगून पाठविलें जे. अमचे पुत्र असला तरी बाजी घोरपडे मधुनकर याचे पारपत्यें करणें त्यावरुन सिवाजी राजे पनळियास येऊन जमाव करुन मुधाल करास मारीले. बाजी घोरपडे खुद मारीले. तीनहजार माणुस घोरपडे यांचे जातीचे कापून काढीले. त्या मध्ये वेंकाजी घोरपडे अजलोस पलोन गेला. सुड घेतला त्या उपरी शाहाजी राजे याणी घोरपडे

यांची हकिगत ऐकनांच बहुत खुशाल जाले. विजयपूरास आहे. त्याचे भेटीस जावे ऐसा विचार करुन फौज सहवर्तमान पुण्यास आले. सिवाजीराजे सहवर्तमान कारकून व मावले लोक च्यालीस हजार सोमोर गेले. माहाराजानी हाती वरि अंबारींत होते. हे देखतांच सिवाजीराजे घोडयाखाली उतरुन खुरनीश करीत समीप गेला. माहाराज हाती खाले उतरुन भेठि जाहाल्या. एक परहार आनंद बहूत जाहाला. महाराज पालखीतं बैसले. सिवाजीराजे यास बसावयांस बहूत अग्रह केला. परंतू हे बसले नाहित. चरण चाली पालखी समागमे पांच कोश पुण्यास आले. माहालांत जाऊन जिजाइची भेठ घेतली भोजन जाली. वस्त्रे भूषणे परस्परे आली. माहाराज सभेस यऊन बसले होते. ते समई सिवाजी राजे खासी खिजमतगारा पासोन पाय पासी जोडा मागुन आपले हाती घेऊन पाटिमागे हुदे करी होता. त्यांत उभेराहिले. रघुनाथराव नारायण याणी देखील त्याणी माहाराज सांगीतले. मागे पाहुन हाती धरुन आपणा सनिध बसवीले. अदर बहुत केला. दोनी मास महाराज होते. लश्कराचे खर्च पुरविला. त्याउपरी शाहाजीराजे कर्नाटक प्रांतांत गेले. नंतर रणमस्त अगमची लेंक कोलापुरी प्रांते आला. तेथे युद्ध जाले. तेथे प्रतापराव गुजर गोला लागुन पडला. त्याउपरी बहिर राव मोहिते सनापती जाले. मानपा मोरदेव यासी सेनापतीची पुजा मुजुमु सांगीतली होती. ती दुर करुन आणाजी रंगनाथ मलेकर याची पुरंदरीची सबनीस होती ती दुर करुन त्यास मजमु सांगतिले. हामाजी पुरंजद कारभारी होता. बावाजी सरमुज मुनीस होता. त्या उपरी शाहाजीराजे व रणदुलाखान व सरज्याखान वगैरे मोहिमेस बिदनुर प्रांते गेले. तुंगभद्रा तीर तेथे मुकाम होता. सिकारीस महाराज गेले. ससियाचे पाठि घोडीवर बसून लागले. घोडीचा पाया अडवा पडून मुरकुडली. राजे खाले आले. घोडयाची पाये राजीयांचा सुसाठि मधे पडतांच देह अवसान जाले. तो गांव पातशाहानी ईनाम दिलहा. त्या स्थली गुमठ माहाराजांची आहे. दिवा बतीस गाव दिलहा आहे. त्याउपरी सिवाजीराजे याणी विज्यापुरीची पेठें व दवलतपूर मारीले. भोवातला अनर्थ बहुत मांडिला. हमेशा फौज

भोवतली फिरो लागली. त्यावरुन विज्यापूरच्या पातशाहानी जालबंदी सातलक्ष होन देऊ केला. शामजी नाईक नेहेमी वकीलीस ठेविले. त्याउपरी भागानगरच्या मुळुक हि जर केला. बातशाहा व मादणापंत दिवाण त्यानी मदणापंताचे वकिलीस आले. तह केला. नवलक्ष होन वर्षास द्यावे ऐसा करार जाला. माहाराजाचे निसबतीने निशाजी राऊजी तेथे हेजीबा होता. ते शांत जाहला. यावर त्याचे पुत्र प्राहादनी राजी हिजीब होत - त्याउपरी बराडा कडिल कारंजे मारिले, दरया सागर व दौलत यांसी अरमराची सुभा सांगीतले. सिलसिलातयार करुन कुडाला कडुन लखम सावंत यासी भेठिस आणीले. त्यास दरमाहा तीनीसे व्होन तीस माणसास देऊ केलें. तीस माणसें ठेविली सालकडे पाठविले. इतकीयांत ईसबखान गाडीदी व हावसी याणे सेखी मारुन घाठ पावेतो आला. माहाराज आले हे वर्तमान ऐकून माधारा फिरला. त्याजकडे राजकारण करावेयास शंकराजीपंत व बाजी भोलप पाठविले. ते राजपुरीस ईसाफखान व खैरतखान यास हावसी याजला बौलाविले की जेंजीरा अम्हास देणे. तुम्हास पैका व सरंजमाम देतो. त्याजवर हावसी बोलीला जे तुंम्हि जेंजेरी काय म्हणुन मागवंतां पंत मजकूरयास अरमावीले, पंती विच्याराव धाळुन क्रीया शेस देऊन माधारे आले माहाराजास सांगीतले की जंजीर यांची गोष्टी नकारावे म्हणूण शेपत करुन निघुन आल. माहाराज बोलीजे की माराती जाणे. पंतानी ऐकीले नाहि. तेंव्हा माहाराजानी फारच अग्रहा केला त्याजवर पंत बोली लेजे क्रीयास अंतरपडले याजकरीतां कदापी जाणार नाहिं माहाराज येतीराज आणौन शमराज पंत अज्ञ मागोन वरी बैसले. त्याजउपरि तीकडे नीलोपंतरवाण केले. त्याज बराबर दरयाखान उर्फ सागर व दौलतखान व मायाजी पंत व पांच हजार अरमार सुधा दिलहा. समुद्रांतून अरमारा निवडा घातला. मजुमुदार पंती मावले लोकनिसि जाऊन चौगीई बंद केला. त्या जागा पीराची जव्होदस व बसवीक पाया घातला. तेंव्हा जातगावकर जोसी याणी मुहुर्त दिलहा. तो उतम मुहूत होता. याज करीतां जागा हातास नयेइ. मजमुदार पंती जागा

जागा चौकया पाठऊन आले. जंजीरायास फते न जाहाले. त्या लोकास धरुन आणीले. आणो भाऊबंद मारिले. खैरात च्यांडुन विज्यापूरास गेला. याउपरी राजपुरीची मसलती हाती योजना केली. कोणाच्याने आंगी जीनहोय. तेव्हा सवांचे अनुमेत व्यांकाजी सोमनाथ व बाळाजी सोमाजी यास पाठवावे. ऐसा सिधांत जाला. तो माहाराजास मानीले कीतेक झुंझारा त्यास जासुसी जालाहोता. याजकरीतां त्यासी रवाण केला. पांच हजार स्वार व दोनी हजार मावले दिल्हे. तो खैरावखान विजापूरास गेला होता. तो जोरावरीने बरवाडी व तेलधोसाले यावरुन जैंजरी यास गेला. त्यास माहाराजानी वहुत मदत केला. परंतु तो हातास लागला नाहिं. व्यंकाजी पंत सोमनाथ याणी साखरीचे ठोप घालुन वैसले. फते: खाननि व जंजीरकरानी मोकासी यांचे भाउबंद हबसीस झुंजास पाठविले. त्याजवरुन मोकासी बोलीलेकी अम्ही थोडकेय पयादे व स्वारीची अमची बरोबरी होणार नाहिं. अम्ही जाऊन वाटा धरीतों. गनीमास रसद पोहंचु देत नाहिं रात्री छपा घालुन जेर करितों. हि गोष्टी फते:खान-यास नापसंद जालि. हाबसीयास वळच रवाणकेली. सिंदि आंबर व सेख सरदार बरोबर दिल्हा होता. तो जाऊन जुंज्यास उभ राहिला. जुंजद्धा मारी जाले. हावसी याचा मोड जाला. सिंदीअंबर व सेख पळुन कोटास आले. त्याजवरुन मोरोपंत पेशवेयानी सोमनाथ यास कुमकीस अरमारची सुभा देऊन वेढा घातला. दौलतखान याणी किल्ला बांधीला. नाम पटापुर दर्ग टेविले. आणि जंजीरा यावर तोफांची मारा साधीला. तो सिंदीस बुल्सुरतेहुन जंजीरा याचे कुमकीस अरमारा घेऊन आला. त्यास लडाई करुन मोड जमा बुडले. बळ जाऊन बाभुले मारीले. जंजीरा याचे फीतव्यांत लोक होते. त्यास बुडविले. सरवींचे रवाडिंत दर्या सागरयाचे अरमार घेऊन वागजालिस वेडा घातला. आणी तोफा काढुन जंजीरयां वरी मारगीरी केली. दरवाजे राखिला. जागा जागा कोट मोरो पंत, व्यंकाजी पंत यानी बांदिले मुलुक पाटिसी घालुन कौल दिल्हा. मालवण वगैरे कोटा व रत्नगीरी व सुवर्णदुर्ग बांधावयास काम लाविला. महिपतगड व खेलाण फार प्रबळ पाहून तेथे अंबाजीपंत यास घोडीयाची पागा बांधावयास सांगीतले. किल्ल तमाम

इमारीतीची काम वगैरे पाहून लागला. तेंव्हा मोरोपंत व निळोपंत याणी अर्ज केला कीं इमारतीस पैका खर्च फार होतो, गड बहुत जाले. माहाराज आतां किले बांधीतात याचे कारण काय. हे ऐकुन माहाराज बोलीली कीं तुम्ही बहुत शाहणे आणी सावध आहा परंतु याचे विचार पाहून बोलीला नाहिं - जो किला बांधीतो, काय निमीत्ये म्हणाल तरी कुणबी शेतांत माला घालुन शेत राखतात तैसे किले राज्यास रक्षणार्थ आहेत. तारवासकिले मारुन तरी बळकट करीतात. तैसी राज्यास बळकटि किल्याची ओह. अवरंगजेवा सारीखा राज्यावर चालुन आला तरी तीनीसे किले सामान पोत्या आसलीयांवर अवरगजेवाची उमर होऊन जाईल म्हणौन किल्याची पुस्तापनाः राज्यास असावी. ऐसे माहाराज बोलीले—त्याउपरी उभयेता पंतास सांगीतले दोन वरुषाची सरंजाम व दारु, गोळा वगैरे बेगमी करावीन्हणुन. अवरगजेबाच्या दाडया तोडतील गडा खाली उतरुन ठोणपयाने मारीतील. ऐसे ऐकून पंत खुष होऊन वरास आले आणी म्हणून लागले कीं माहाराजाचे बुधी पुढे आपली-बुधी काहि नाहिं. त्याउपरी जागा खुठ डोंगर असेल तेथे किला बांदावयास जागा पाहुन काम चालविले. जेथे कच्चे काम होते तेथील ईमारतीची कारकुन हवालदार दुर करुन दुसेरे ठेविले. माहाराज येऊन प्रतापगडास राहिले. मागे अपाजी पंत यानी अंताजी अंबाजी यास पाहाणेची आज्ञा सांगीतला. पाहणी करुन घोर दिदला. मुलुकास कौल दिल्हा. माहाराज मुलुकांत भिरोन खडणी घेत चालीले. नरगुंद प्रांतास गेले. बरोबर बहिरराव मोहिते व रुपाजीमोहिते व संताजी जेगथापव व मानसींग मोर याजवर सरफराज करोन सदनखान यास गोखाखे जवळ घांटिले. लढाई बहूत जालि. हसनखान याज समागमे पठाण होता. यांचे सात रोज जुंझ जाले. हासनखानाचा मोड जाला. खाणाचे अंग सूस्थुल होता. हाती खेरीज स्वारी चालेना. तेव्हा तो पडावा जाला. लरुष्कर बुडवीले. ते समई बहिरराव कामास आले. हासन खानास माहाराज बोलीले कीं कोपल ठीकिला भांडत आहे, तो खाली करुन घेणे. हासनखान किला खाली करोन देतनाहि म्हणुन बोलीला. त्या उपरी कोपलास जाऊन वेढ घातला. किला घेऊन हासनखान व त्याचे कबीजे सुधां सोडुन दिल्हा

त्याणे जाऊन विषये प्रळये करुन प्राण दिल्हा. त्याजवर सिदि दिलाल व जाधवराव भेरिले बाजारपुरी मारीले. पेट लुट्टन कोट हातास आलानाहिं. तो फौज बीज्या वरोन धावल्या याज करीतां निधुन आले. तो राजपुरीचे ध्यास लागला याजकरीतां केल शीवाय युकुफ होता. त्याची दर्शनास जाऊन मंनात संक्लप केला होता. बावायाकुफ उटोन चालिला. त्यामागे आपणाहि हिंडुलागला. माहाराजांचे पाय मागे लागले. फिरुन डेंऱ्यास आले. तेव्हा पिकला केस माहाराजाचे हाती दिल्हा. गोविंद विश्वनाथ यास सांगीतलें कीं ताईत करणे. त्याणी ताईत केला परंतु गोविंद वीश्वनाथ प्रभु याज पासोन केंस गमावला याजकरीतां त्याजवर ईतराजी होऊन पोतेनीसीं वरुन दूर केला. राजापुरी यास कोण प्रयेत्न लागला म्हणून बोलीले. त्याउपरी रायगडास आलें प्रधान पंतामधे व मजमुदारामधें बरकसी लागली. हे माहाराजानी जाणौन मोरोपंताची कन्या नीलोपंताची शेरींर संमध योजला. मोरोपंताची कन्या नीलापंताचे पुत्र रामचेंद्रपंत यासी दिल्हिं. अणि हुजूर येतांच सख्य करोन दिल्ही. खिलाफ असल्यास राज्यास आपाये होईल याजकरीतां कीडा तोडिला. त्याजवर येकोजी राजे चेंदावरी राज्ये करीत असतां त्याजपासी रघुनाथ नारायेण मजमदार शाहाजी राजे याणी ठेविले होते. त्याणी सिवाजी माहाराजाची कीर्तीपराक्रम ऐकोन बुधी सांगुलागले कीं सिवाजी माहाराजानी स्वपराक्रमे राज्ये मेळविले. त्याप्रताणे आपणहि मेंळविले व मिळवावे त्यासी येकाजी राजे बोलीलेजे आपण पातशाई दौलत खातो. त्याजवर कमरबंदि करोन पातशाहाहि घयावी हे उचीत नाहिं. त्याजवरोन रघुनाथ पंताची व येगोजीराजे यांची बोली जालीयां करीतां वाराणासीस जावे यांचे आज्ञा घेऊन आपलि खासगत पागा पांचसे स्वार व .बारा हाती समागमे घेऊन विज्यापूरास आले. पातशाहानी बहूत आदर केला. दिवणगीरी द्यावी ऐसा निश्चये केला. सिवाजी माहाराज पनाळिस आले होते. त्यास हे वर्त्तमान विहित जाले. रघुनाथ पंतास पत्र पाठवून पनाळी यासी घेऊन गेले. आधर बहुत केला. पंतास मजमु सांगोन आपणाजवळ टेविले. त्यास म्हणु लागले कीं येकोजी राजे व तुंम्ही काये पराक्रम केला. थोरले माहाराजानी

तुंम्हास पंद्रालक्षे होनाचा तनखा करोन देऊन एकोजी राजे याजवळ ठेविले आणि माहाराज बेंगळूरास राहात होते. तुंम्ही स्वतंत्र असता कोणासी युद्ध केले, कोणती फौज बुडविली. चंदित एक खवास खान होता. त्यास देखील बुडविले नाहिं. अंम्ही च्यारलक्ष होनाच्या तनखा व साठिलक्षे होनाची मुलूक मेळविला. येसी लाख होन खंडण्या घेतले व चाळीस हाजार पागा व च्याळीस हजार फौज व दोनी लक्षे मावले पाय लोक व अरमारे व किले कोठ तीनीसे घेतले. नवी जगा बांधील्या. वडिलाचे नावाची कीर्ती केली. तुंम्ही जादिद काहिं मेळविलं नाहिं - त्याजवर सांप्रत पंती उत्तर केले "महाराज म्हणता हे प्रमाण परंतु सेवकाचे धण्याणी ऐकोन विचार केला म्हणीजे धण्याचा हुकुमावर चाकरानी सेवा करावी. न ऐकिल्यास उपाये काय तुंम्हास अंम्ही मसलति सांगीतली कीं हिताची किंवा अनिहिताची हे ध्यानास अणाता अंम्हास मात्र म्हणावे क्षणक्षणा वेडे ब्राम्हण तेंव्हा अमचे समीप राहिल्याचे महत्वे काये. यास्तव अज्ञामागुन वारणासीस चालीलों." मग माहाराज बोलीले की तुंम्ही हिताची मसलत सांगीतली ते अंम्ही ऐकावी हे खरे. त्याजवर पंत बोलीलेजें चंदिचा राज्य च्याळीस लक्ष याचें वरुषाचे वारा लक्षाचे तेथे बरावरी निंय वांठणा तुंम्हासी धर्म न्याय न्हहोये पोंहचतो. साहेबी फौज सहवर्तमान कर्नाटकप्रांते चालावें हि मसलत देऊन जावयांची निक्षेये केला. संभाजी राजे व राजाराम त्याजवळ मोरोपंत पेशवे व अंनाजीपंत ठेऊन देशाची बंदोबस्ता करुन दक्षण प्रांते च्चालीले. बराबर च्याळीस हाजार पागा व च्याळीस हाजार मावले व बहिर राव सेनापती सहवर्तमान जाऊन कनक गिरी पाळे येथें मुकाम केला. तेथे सेनापती नीसंग अरबी यांची नसकची घेतली होती. चैत्र मासी बारा पाऊस पडला. त्यासमई डेर्यांत सींगी सेनापतीनि बंदिली हे वर्तमान राजेश्रीस विहित जाले. ते समई अन्नाजी रघुनाथ यासी सांगोन पोत्या पैकी नगद होन सवासे देऊन पागेची डाग दिल्हा. आणीं सींगी योगास लावीली. त्याउपरी रघुनाथपंती विनंती केलीकिं भागानगरचे पातशाहासी राजकारण करावें. त्याची भेटि घेऊन त्याची फौज समागमे घेऊन जावें. त्याजवर

तनशा: पातशाहा याजकडें नीलोपंतास पाठऊन राजकारण केला. त्या उपरी सिवाजीराजे भागानरास गेले. पुढे मादाणपंत दवीर व बहिरराव सेनापती व अंनाजीरंगनाथ मजमुदार व खीजमतगार दोघे इतकियांसी आज्ञा केली. प्रावार नारायण हेजीव होता. ते समई आंणाजी रंगनाथ याणी राजश्रीस दावणास धरून उभे केले आणी सख्या बदली केलीजे. भले लोका समागमे द्यावें. त्यावरुन मानसींग मोरे व रुपाजी भोसले वगैरे पांच जण घेतले. राजश्री दाहा माहालांत जाऊन बसलें. ते ठाई जातांच माहालांतून तानश पातशाहा आले. भेटि जाहालयावर रघुनाथ नरययेण येकास बसावयांचे आज्ञा ते समई मादण पंत उभे होते. प्रल्हाद पंतास भेटाणयाची आज्ञा घेतली-तेंव्हा आपण बसले वरकड सर्व उभे होते. तेंव्हा पातशाहा बोलीलेजे 'तुमचे लश्करांव बाहेर राहिले', माहाराजानी उत्तर केलें कीं पातशाहाची फौज व मुतसहि बाहेरच आहेत. पातशाहा आपले मनी समजुन उगेच राहिले. विडयाचे बहुत आग्रह केला. राजेसाहेबी उतर दिलहेजे "श्रीवाराणसी जाऊन श्रीचे स्तापना करुन तेंव्हा विडा घेऊ. विज्यापूर व भागानगर चे पातशाहानी नालबंदी धयावी म्हणजे दिल्ली पावेतो मुल्क घेऊन नरमदा पावेतो स्वराज्य करावे. इकडे कासी पावेतो स्वराज्य करावें हे उत्तर दिल्हें. मग पातशाहानी पांच लक्ष व्होन खर्चास व घोडे अरबी व दाहा हाती व पांच लक्ष व्होनाची सुवर्णाची पालरखी दिली. खालती फौज च्याळीस हाजार मावले च्याळीस हाजार यासी पोशाख उत्तम देऊन शृंगारुन उभी केली. त्या उपरी पातशाहानी पुसलेकी "तुमचे मावले लोक यांची बहुत अस्करा ऐकतो." त्याजवर माहाराज बोलीलें कीं मावले लोकानी होत. मोरांपताजवळ राज्य रक्षणार्थ टेविले. त्याजबराबर प्यादे होते. ते शाहणे करावयासी आणीले आहेत. त्यावर पातशाहा बोलीळेकीं केंवाहि हाती बरावर जुंजांतील की काये. माहा-राजानी बोलीलेकीं पातशाहाचे हाती बरोबर लढेले ऐसे कोण अहे परंतु तमाशा पाहावा ऐसे मर्जी जालीतर पाहावा. त्याजवर येसोजी मंला यासी बोलाऊन सांगीतले. मावले लोक आणीविले. आणी सांगीत-

लेकी "पातशाहाचे हाती बरोबर लढावें" ऐसे बालतांच येसोजीमला म्हणल । जे "हाती सोडा वा." त्याजवरुन मस्त हाती आणविला. माहाराजास ईशारत करुन येंसाजीमला याजवर हाती चालविला. दोन हरीशया करुन हाती फीरविला. सोंडेवर वारकेला. आणीखीहि दोन च्यार वार तरवारचे चालविले. हाती माघारा फीरविला. मग साहेब महेरबान होऊन लोक मजकूरास नावाजीले. माहाराजानी लोकांस बोलाऊन जडीता चीलाऊ-दिल्हा. मग आज्ञ घेऊन अगेंलत उतरले. त्याउपरी भानगागीरी एक मास मुकाम होता. श्री केशवस्वामीचा कथा नित्ये मोहछव मदाणा पंताचे घरी होत असें. तेथे मेजवानी जाली. त्याउपरी भागानगराहून स्वार जाले. ते कनोळ तुंगभद्रा तीरी येथे येऊन मुकाम केला. पांचलक्ष होन घेतले. अनंदराव कर्नलिकर देशमुख येऊन भेटला. तेथुन श्रीशैलास गेले. अनंतपूर येथे लश्कराच्य मुकाम केला तेथुन पर्वत वरोन गोयमुखा पासोन गावेपाई जाऊन कुंडी उतरचे छमीलोन तीनी कोस दो दिवसां श्रीशैल्य मलिकार्जूनास गेले. झाडी बहुत त्या स्थळी नव दिवस होते जातांच वैराग्य प्राप्तजाले. वस्त्रे ठाकीली विभूत लेपोन रुद्राक्षमाला परीधान केले. शेस्त्रघाते सीरकमल श्रीदेवास अर्पण रावे हा हेत धरीला हे राज्य अंती नर्क यैसे जाणून रघुनाथ पंतास व समस्तास म्हणोलागलाकीं तुंम्ही देशास जाणे. पुत्र अहेत. त्यास हाती धरुन राज्य कारभार करणें. भोवताळीच व किं नव दिवस होती. शस्त्रे लपवीत असेत मग नानाप्रकारे रघुनाथपंती बोध करोन सावध केले. वस्त्रें घेवली लक्ष ब्रम्हणाची संकल्प व सहस्त्र खांबी मंडप धर्मशाला बांधून सर्व यात्रा करुन पुढे मजलदरमजल चेंदीस गेले. जातांच किले वेंलुरास वेढा घातला. तेथे नवे किले साजरे गोजरे किले होते ते वसविले. त्याजवरी तोफा चढऊन कियूवर मारसाधीला. नरहरी रुद्रनानाचे ठेविले. पांच हाजार मावळे व दोनी हजार फौज ठेऊन अपण चंदिस गेले. दुरमाराचु मांडुन उभे राहिले. किलेदार अंबरखान होता. त्यास सांगून पाठविले जे विज्यापूरच्या पातशाहास सला जाला. त्याचे अंम्ही चाकर भाईचारा जाला याउपरी भेटिस येणे. अंबरखानास आठ जण पुत्र होते. त्यास सद्वर्तमान बेविश्वासें भेटिस आला.

राजेसाहेबी भेटि होतांच पुत्रासहवर्तमान हस्तकेला. तेच जोरावारीने किल्ले देखील गडफते जाला. राज्यानी निलगे हवालदार व विट्ठलदीन देव अत्रे सुभेदार माहालचे केले. प्रथम चंदि फते केली. इमारतीवर रुद्राजी सालवी ठेविले. त्या उपरी चेंदि पलीकडे नजीक त्रीवारी तेथे मुकाम करुन येकोजीराजे यासी पत्रें पाठविली की माहाराज साहेब ॥ पासून तुमची अमची भेटि जेन्मा पासुन नाहिं. भेटिची हेत धरुन देसीहून तुंम्हाकडे आलो. तुंम्ही भेटिसयेणे.' त्याजवरुन येकोजीराजे फौज सहवर्तमान जगनाथपंत दिवाण समागमे घेऊन आले. भेटिस सिवालई विधीयुक्त जाला. धर्म बहुत केळा. त्याउपरी उभयेतां येक ताटी बसोन भोजन करीत असेंत. एकांती राहुटिंत बसुन नित्य वाद होऊन लागला. रघुनाथपंत व बहिरराव सेनापती व मजमदार बालप्रभु चिटिनीस येकांती असे. वात रोटिचा विभाग चेंदावरीच घ्यावा ऐसी भाषणे होत असे. येकोजीराजे म्हणतातकीं आपण देत नाहि. तुंम्ही देशी राज्ये घेतले आहेत तेथे अंम्हास वांठा घ्यावे. त्यास सिवाजी राजे म्हणालेकीं अंम्ही आपले पराक्रमे राज्जे मिळेविले त्यांत तुमचे काहि नाहि". ऐसीया नित्य तह जाहाल्या. मग धररावीध्ये करुन श्री ज्यास यशे दीईल त्याज प्रमाणे वर्तुणक करावी ऐसा निश्चये जाला. मग येकोजीराजे चेंदवरास उठुन गेले. त्यास वेलवीत बहिरराव सेनापती व अणाजी रंगनाथ पांचहजार फौजेनिसीं गेले होते. त्यास वस्त्रे देऊन माधारा लाविले. त्याउपरी सिवाजी माहाराज याणी रघुनाथ पंत फौज सहवर्तमान ठेऊन देशास मानाजी मोरे व अनदराव पंजे-हाजारी समागमे घेऊन देशास पनालीयास आले. मागे युध येकोजीराजे यांची फोज जेगनाथपंत दिवाण व भीमाजीराजे व राणाजी राजे तमाम सरदार वीस हजार फौज व पन्नस हजार प्यायादे यैसे चाळुन आले. रघुनाथरावपंत व दविर बुजेंगेचें अश्रेयाने ठेऊन जरोर होऊन भुंताले उभे राहुन घेराधतला. च्याळीस हजार फौजच्या चार टोळया करोन चहुकडे घोडी घातली. प्यादे दोनी हजार मारीतांच उरले व पळोन गेले. मोडजाला फौज बुडविली कुल सरदार धरुन आणीले हाजार सिपाई व ब्रह्मण वगैरे युधांत मेले. रघुनाथ पंताकडिल पांचसे बारगीर खस्त-

जाले फते जाली. सलुकशाहाला निमे राज्ये कावेरी पासून आलिकडे किले ताहाद बलापूर कोलार माहाराजगड करनटकगड कुलठाणी घेतली. कसबे आरणी पायांकोट टाणेदुर्ग दोनी व कील त्या खालीते तीनी लक्षाची मुलुक व वैरोजी बासकर त्यास इनाम राजेश्रीनी दिलहा. त्याचे वाटे गेलेनाहित. चेंदिचे राज्ये कुल निमे घेऊन रघुनाथ पंतास त्या प्रांती ठेऊन फौजा देशास अल्या. पनास लक्ष होनाचे राज्ये घेतले विज्यापूरच्या पातशहाच्या फौजा अडव्या आलया बहिर रावयास वाटेस अडविले. सवत्र चेंदि व वेलुर किले घेतला त्या भांताले विजापूर काराची मुलुक होता तो घेतला म्हणौन युधास फौज आलि. युध जाले विज्यापूरकराची फौज बुडविला. दोनी सरदार पडावा करुन रायगडास आले. बहिरराव आणाजी रंगनाथ यासी वखसीस इनाम दिल्हे. फते: जाली त्याउपरी वदेमुर्ती राजेश्री गंगाभट वारणास्सीकर येऊन मुंजेबंध केले. पट्टाभिशेक करोन सिंव्हासनारुड जाले मुकाम राय गडी. त्याउपरी फौज घेऊन जालणापूर मारीले. मियाजान महमद खुदावद फकिर त्याच्या जाग्यात बेटेक केली. फकीराची तकीद होता त्याचा तसनस जाला. तो रणमस्तखान पातशाहास वहदर चाकर होता. तो बोलाऊन आला युध जाले. सिदोजी निंबळकर पांच हजारी गोला लागून पडला लोकहि वहुत जया जाहाले. राजे रातोरात किले पट्टीयास आले. गडाचे नाव विंश्रातगड ठेविले. मानसींग मारे संताजी घोरफडे याणी युध समई उतावली केली म्हणौन त्यावर ईतराजी जाले हाजरी त्यांची दुरकेली. त्याउपरी राजे किले रायगडास आले. हेजीवानी वर्तमान दिलीस लिहिले. ते ऐकुन पातशाहानी रणमस्तखांनास सिरोपाव पाठिविले. त्याजवर त्याणी येऊन देऊळ गांवाचा कोट बांधीला. माहाराजानी कुल मुलुकाची पाहाणी केली. प्रतापगडास आले. आणी श्रीभवानीचे दर्शण घेऊन मोहोछव केला. तेथून रायगडास आले, राजाराम यांचे लग्न केले. प्रतापराव गुजर व यांची कन्या करोन नाव सीताबाई ठेविले. तेथून राजापूरास आले. आपली तुला-केली. सहश्रगोदान दिलही त्याउपरी रायगडास गेले. दसरा होंताच कुल सरदार व फौजा मुलुकांत गेल्या त्याजवरुन राजे स्वामीस नवा

ज्वर जाला. शेक १६०२ रौद्रीनामसंवछरी चौत्र पौर्णीमा दोनी प्रहरि राजे स्वामीस कैलास वास जाला. अंतकाळी धर्म बहूत केला. भागीर्थीचे उदक होते. त्यान श्रान करुन विभुतीचे रचना केले. हरीदास बोलावुन सिवस्मरण व कीर्तन करविले. मोरोपंत पेशवे व आणाजी दतो सुरणवीस बालप्रभु चिटनीस सनीध्र होते. सावध पणे ते समई तह पत्र देऊन ईश्वर स्मरण करोन देह ठेविला. शाहाजी भोंसळे होते याजकडुन क्रीया करविली. त्याउपरांत मसलतकरुन खंडोजी जासुसाचा नाईक किले पनालीयास रवाणा केला. सोमाजी नाईक व बहिरजी नाईक इंगळे हावालदार व हिरोजी फरजंद व जेनार्दपंत यास पत्र लिहिलीकी संभाजीराजे यास कैद करोन ठेवणे. आणि राजाराम यास राजी बैसून कारभार करु लागला. कोठास व मुलुकास पत्रे पाठविलींकी माहाराजास कैलास वास जाला. राजाराम राजा मंचेकारुढ जाहाला. ऐसे पत्र लिहिले. लष्करांत बहिरजीराव व रघुजी भोंसले व आनंदराव निंबळकर व माहाडिक व गुजर होते. त्याजकडे फौजाचा तह करुन संभाजी राजे पनालीयास होते. त्यास कैद करावे हे केले. राजाराम गडावरुन पांच वाडयास आले. तेथे जमावकरुन सातार्यास आले तो पनाळीयास खंडुजासुस पोहचला. सोमाजी हाकिला व किलेदार व बहिरजी फरजेदेव व संभाजी सबनीस व जनार्धनपंत ऐसे कोलापुरास श्रीदेविचे दर्शनास गेले होते. किल्याचे लोकास पत्र माहाराजाने कुतर्मान पत्रें माहाराजा-कडिल लिहिली होती. ती संभाजीराजे यांस दाखविली. संभाजी यानी माहाराजचे नावे वर्तमान पुसिले. क्षेमरुप खुशाल आहेत म्हणौन सांगीतले. येकांती येऊन वर्तमान रसांगीतले कीं माहाराजास देव आज्ञा जाहली. राजाराम साहेब मंचकारुढ जाले. अपण पत्रे घेऊन तुंम्हास कैद करावें म्हणौन आलो. साहेबी सोमाजी नाईक हावालदार यास आणौन पुसावें मग अर्पणास विस्तार सांगु. त्याजवर आपणा जवलीले लोक विश्वासुक होते ते पाहुन सोमाजी नाईक व समस्तास बोलाऊन पुसुंन लागले कीं तुंम्हास साहेबाचे व पंत प्रधान याचेहि पत्रें आले आहे ती अंम्हास पाहठवणे. तेंव्हा त्याणी कुतर्माने कागदच होत ते दाखविले. त्याजवरी खंडोजासुस आणौन रुजुवातं केली. त्याणे सकळ

वृतांत सांगीतले. तैसे कोप करुन सोमाजी नाईक यांस कोंडून टेविले व कीलयाचे हावालदार व सबनीविस कैद केले. हिरोजी फर्जंद कैदकरावे तो पळुन गेला. त्यासी चिपळणच्या घाटावरोन धरुन आणीला. जनार्धन पंतयास कोलापूरास आणुन कैद केले. लषकरांत सरदारास पत्र पाठऊन बंदोबसा करीता चालिले. मोरोपंत व सरकारकून बोलीलेकीं संभाजीराजे यास स्वामीत्व आलियास अमची प्रतीज्ञा राहाणार नाहिं बहुत कुरुर आहेत. राज्य कारभारे मुतसद्दियाने होणार नाहिं. तदनंतर लश्कराचा सरदारानी विच्यार केलाकीं संभाजीराजे थोर शाहाणा आहे. सर्वहि गोष्टीस मान देत आहे. राजारामानी बैसल्यावर ब्रम्हण व प्रभु मिळोन सर्व एककर होईलसे दिसते म्हणोन विच्यार कारोन पेशव्यास व सर कारकूनयांस बोलिले की अंम्ही संभाजी राजेस लिहुन फठवितों आणी तुंम्हास भेठिविशेष ऐसे बोळुन संभाजी राजे यास लिहिले जे साहेबी अंम्हास कौलपाठवावा म्हणीजे सर्वत्र येऊन भेटीतो चाकर साहेबांचे आहे तेसे लिहिले. त्याजवरुन संभाजी राजे याणी कौल पाठविला आणी लश्काराच्या सरदारास लिहिले की पावलोक सुधा येणे. त्याजवरुन समोर सारे जमा होऊन पनालियास जाऊन भेटिले. लोक जफ्तिखाले आणोन सोमाजी नाईकास मारीले. पेशवे आणाजीपंत यास कैद केले. पूर्वी रायगडच्या सरनौवतास व नाईक वाडियास वर्तमान कळलें नव्हाते. त्याणी मानोजी भांडवलकर व किलेदार व सबनीस ऐसे कैद केले. सरकारकुनाच्या घरी चौक्या बसऊन किल्याचे बंदोबस्त केला. संभाजीराजे याजकडे वेसाजी सिरके नाईक वाडिस पाठविले आणी लिहिलेकीं अंम्ही याप्रमाणे केले चाकर साहेबाचे आहो. आज्ञाहोईल त्या प्रमाणे वर्तणूक करु. संभाजी राजे याणी येसाजी खंडेराव यास सिरोपाव देऊन पोणसे होन तैनात केली. रायगडास फिरोन पाठविले. सरनौबतास व नाईकवाडीयासीं व किल्ले कोठास कौल पाठविले की खबरदार राहणे 'चौक्या पाऱ्हाया चौकसीने करीत जाणे. तुंम्हास साहेब सरफराज करोतील कित्तेक लोक फितवा होते त्यास मारिले. किल्याच्या व माहालो माहालाचे व मुलुकाचे खबरा आल. त्यसी संमधी पत्र पाठविली. पिलाजीराव सिरके यासी दाहाहाजार लोकीची

सरंजामी देऊन रायगडास जमा व सुध्यां पाठविले. पांचवाडयास व वाडिस बंदोबस्त लष्करच्या लोकांची कीत्रा शपत घेऊन माहाराज संभाजीराजे रायगडास आले. तो खांदेरी वरोन मायक नाईकांची उदरी तीनेसे माणसाणीसी धावला. तेथे जुंजा जाले. अरमार घेऊन फिरोन खंदेरीस आला तो तेथे ठार जाहाला. त्याचे डोसक कापूने आणीले. आणो गलबतात घालुन म्मुभाइस पाठीवीले. सेख महमद हुदेरीवरी किलेदार होता. त्याजवर दोनी तीनी येलगार केले. परंतु बाजु सरंजाम नाहि. संभाजीराजे याणी राजारामास कैद केले व टेविले सोइरावा इंगळास फासा लोगोन घेऊन प्राणत्याग केला. व पुतलाबाई आग्नी प्रवेश केला. उपरांतीक संभाजीराजे याणी पुनहा विधे पुरस्तर सिवाजी माहाराजाची क्रिया केलि. धर्म बहुत केला. त्या उपरांत कवजी बावा आले. त्यास कारभार देऊन लाविला. लश्करांतील हक बाजी कारभार करुन लागला. दिवस दिवस कवजी बावाचे प्राधान्ये विशेष होत चालिले. सोमजी नाईक हा किल्यांची मुलेमाणसें टेक नामीच्या कडया वरोन टाकिलि. बापुजी कांडराव व सुर्याजी माहाडिक व मानोजी कांडराव, हावाल सांगीतले. येसाजी व सोनजी फर्जंद यावरी विस्वास दिल्हा. मोरोपंत पेशवे व आणाजीपंत याची घरे लुटले. सिंम्हासन छत्रे करवीले. परंजी माहाडिक व गणोजी सिरके व आंचीकाजी माहाडीक व तुकोजी पाळकर व महदाजी निंबळकर याणी बहुत प्रकारे अर्ज करोन सरकार पुज्याच्या घरच्या चौक्या उठवुन आणीविला. सभेस बसऊन न्याये केला. त्याप्रमाणे चालावे म्हणुन बोलीले. आणी बाळाजी प्रभुचे पुत्र गगांधर प्रभु मजमुदार व निरोजीपंत मुतालीक पेशवेईचे उबोजी जगदेव पेशवाईचा कारभार करुन लागले. सिंव्हासन सिद्ध जाले. त्यावर माहाराजानी संपदाकेले आहे ती पाहावी शोध करावा येसेच चित्तांत आणौन पाहावेयास कारकून योजीले. तेंव्हा कोणी इतबारी द्रिष्टीस नपडे. मग आपणच खुद पाहु लागला वितपसील.

| | | |
|---|---|---|
| सोन वस्ता वजन<br>गोटी साधी येकुनं | .... | ७॥ ३॥ |

लोखंडी सुमारी,
रुपयाचे वस्ता देखील आभरणे १
व भांडी सुधा वजन अनेली सुमार
५७॥ ३॥ २॥
तांबयाचे वजन लाख सुमारी खंडी ११३
पितळ वजन पैकी खंडी सुमारी १७५
लोखंडि दर जिनस वजन मुसार २००००
ठाकया फोंला पाची सुमार ४००००
होना खाजीन्या सुमारी ५०००००
गेंडावर घागरे सुमार २९
सत्तावीस सुमार ऐकलाख १५००००
पन्नास हाजार
नरखहोन सुभेदाराकडे
तसलीमात खेरीज मुळकी ३०००००
सुमारी बाकी
सिशे वजन लोखंडी सुमारी ४४७
कथील वजन लोखंडी सुमार ४४०००
उदटिक सुमार ३००००००
जामादारखाना कापड
सुमारी सनगे १३६४०००

**तपसील :—**

जरीबंद पटैणी सुमार १०००००
सादे सनगे ४०००००
सुमारी रेशमी सनगे
पाणा साडे.
पीदांबर तमील खाने ३०००००
शाल जोडया व शाल नमि ४००००
गोषबंदर सुमारी.

खिलारत्राव ५००००
बानाती तागे सुमार दरजीनस १००००
येकुन तेवीस लक्षे चौसवष्ट हाजार,
कोठी कीता नावाव वगैरे वजनी वजन
खंडी पैकी सुतार

**सुमार :—**

| | |
|---|---|
| लवंगा दाहा खंडी | १० |
| जायेपत्र खंडी | १॥ |
| जायेफळ खंडी | १५ |
| केसर खंडी | २ |
| अवीरबुका खंडी | ५ |
| रांधा | १ |
| अरगजा खंडी | १ |
| चेंदन पंचेवीस खंडी | ५ |
| कृष्णागर खंडी | २॥ |
| कापूर खंडी | १॥ |
| नख खंडी एक | १ |
| गुलाल खंडी | १० |
| रक्तचेंदन खंडी | ५ |
| मोगरेल खंडी | २ |
| सुगंध खंडी | १ |
| चेंबली खंडी | २॥ |
| उदले खंडी | १ |
| चांपले खंडी | १ |
| दीप द्राक्षे खंडी | ५ |
| अक्रोड खंडी | ३ |
| खजुर तीस खंडी | ३० |
| खारीक खंडी | ४० |

| | | | |
|---|---|---|---|
| खोबरे खंडी | ५००० | गोपीचंदन | १०० |
| चिकणी सुपारी खंडी | ७५ | तेल | ७००० |
| बाबर वीस खंडी | २० | सुपारी कोंटी | २००० |
| वेळदोड खंडी | १॥ | जिरे | १०० |
| ऊद खंडी | १ | हरताळ | ७० |
| एकुन | ७६४ | सुंठे | १००० |
| गल्ला खंडी केली सुमारी | तपशील | शंदाक | २००० |
| साली उर्फ भात | १७०० | अंबसोल | २५०० |
| गहु पांधरास | १५०० | काजुचे बिज | ५० |
| हरभरे | ५००० | अपु | २०० |
| उडित | १२०० | मध | २०० |
| मूग | २५०० | वेखंड | ७०० |
| तुरी | १००० | कापूस | ७००००० |
| चवली वठाणे | ५०००० | मेण | १३००० |
| काळे तीळ | २००० | खडीसाखेर | ३०० |
| तांबड तीळ | ३०० | मखदुमी | ८०००० |
| तुरीचे दाळ | २०००० | हाळद | ५०० |
| मुगाची दाळ | १२५ | सुपारी | १०० |
| हरभरेची दाळ | ५०० | हिरडे | १०० |
| रायभोग तांदूळ | ५००० | पांच हजार वजनी मिरच्या | ५०००० |
| तांदुळमोटे | | सात हाजार मोहत्या | १००० |
| तांदूळ मोट | १०००० | पयाज | २००० |
| अंबेमोहर तांदूळ | ५०० | लसुण | ५००० |
| जिरेसाळी तांदूळ | २०० | निळवुडी | १० |
| जेवारी | ३००० | अजाईक | १०० |
| तांबडी साळ तांदूळ | २०० | हिंगळ | ३० |
| मुसेर | १०० | जंगार | २० |
| तपसील एकून तूप | १००० | पिंपळी | १० |
| हिंग | ३०० | खीपल | १० |

7051...

| | |
|---|---|
| ओमा | १०० |
| पतंग | १५० |
| मानावी | १०० |
| साबुण | ७०० |
| साखर चीनी | १५०० |
| तंबाकु | १६००० |
| मिरे | ५०० |
| जीगडदारें | २६०० |
| तवकीरं | ८० |
| धणे | ६७००० |
| गुळ | १०००० |
| सामने | ५००० |
| कांदे | ७००० |
| कागद कोर या गज्या तपसील. | |
| हामसाजी | १००० |
| दौलता बंदी. | ५००० |
| बाळापुरी | १०० |
| इंग्रजीं | १००००० |
| जवाहिर वस्ता जडावाच्य-डागणे तपसील. | |
| अंगठया | १ |
| पदके | १ |
| मोत्याचे तुरे | १ |
| मोत मोहली तुरे | १ |
| नग वेणीचे | १ |
| बाजुबंद | १ |
| कर्नफूल | १ |
| तांगेले जोड | १ |
| पोंचे | १ |

| | |
|---|---|
| पोखराजे | १ |
| पांदली | १ |
| वैडुर्य | १ |
| नीळे | १ |
| बाजात | १ |
| सिरवेचे | १ |
| सिसफूल | १ |
| चेंद्रमोर | १ |
| भांगटिक | १ |
| कर्णया जोड | १ |
| पाटल्या जोड | १ |
| याखेरीज कितेक जिनस | |
| हिरे | १ |
| मोते | १ |
| तपशील | |
| माहली | १ |
| बदल | १ |
| पुरोखी | १ |
| सिलेखाने वगैरे सुमारी तपसील. | |
| सिलेरी डांक | १०० |
| गड्याजा डांक | ३०० |
| बुधली डांक | ७००० |
| तरवार | ३०० |
| पठे | १०००० |
| जमदाडी | २००००० |
| कमाना | १०० |
| ठापे | २०० |
| ईटे | ७०० |
| बरश्या | ४००० |

| | |
|---|---|
| हस्तान | ४००० |
| बख्तर | ४००० |
| चिलखात | २०००० |
| बेडया | ४००० |
| सबले | २००० |
| कुंदाली | ५००० |
| कुराबडी | ६००००० |
| कावले | ५०० |
| कोईते | ७०००० |
| धापया | ३००० |
| पालख्या | ३००० |
| अत्फाबागीर्या | १२००० |
| कर्णे | १३०० |
| नेपुरे | १२०० |
| हलके | ७०० |
| काड्ड | १००० |
| दारुखडी | २०००००० |
| गोळी | ७००००० |
| मोठे लाहाण | ३००० |
| कोरलेले | |
| पांमडी खारी | ५०० |
| येमीगोळे | १०००० |

किता आरसे हातीचे डागणे-
सुमार तपसील

| | |
|---|---|
| जीले | २००००० |
| बाणकैच्या | ३०००० |
| ईलाळ | १००००० |
| चेंद्रजोती | ४००००० |
| हाण्या | १५०००० |
| पुलवानजया | ५०००० |

याखेरीज कितेक सामान गडगडी व अरमारा वरील त्याची मोजुदांत जाहाली नाहि सहरहु प्रमाणे रायेगाडा वरी होते. त्यांची मोजणी करावे यास कारकून आसामिवाले दिडसे व कोटवाले च्यारसें साहा महिने मोजुन इसाब करीत होते. तरीहि कारकून जिनस राहिला. पागा व हाती व पिलखाना शुतार खाना यांची मोजव्या अणीविली तपशील वार.

| | |
|---|---|
| अरबी घोडे | ६०००० |
| तुरकी घोडे | ८००० |
| देशाचे घोडे | १००० |
| मादवाणा | ९०००० |
| हरजिनस घोडे | ७००० |
| यारदी | १००००० |
| सिलेदार फगानिसबतीस | ५०००० |

तपशील नर ३०००० मदि २०००००
माहाल तठी. तपसील.

| | |
|---|---|
| गाई | १००० |
| माहिसि | ५००० |
| मेंडरे व सेल्या | १००००० |
| किता तपसील. हाती जिंजरे | ३१५ |
| कुणबीन हाती | १००० |
| अजुवरदार | १००० |
| बैलरास | ७०००० |

उंठ ४०००

सरदार व पाये लोक आदम्या व हवलदार यांची जिनसी विततपसील.

| | |
|---|---|
| भोसले | १ |
| सिरके | १ |
| अविचरे | १ |
| घोरफडे | १ |
| चिंचकर | १ |
| आंगरे | १ |
| पाटणकर | १ |
| हनवी | १ |
| ढमाळ | १ |
| पानमार | १ |
| सिंदे | १ |
| वोरकार | १ |
| भालेराव | १ |
| कदम | १ |
| भोईर | १ |
| पारट | १ |
| डोसर | १ |
| सावंत | १ |
| माहाडीक | १ |
| केसरकर | १ |
| जेगथाप | १ |
| बानवडे | १ |
| सालेंखे | १ |
| ठाकूर | १ |
| अंविररव | १ |
| मानकर | १ |
| भांडवाळकर | १ |
| माडसे | १ |
| काळे | १ |
| पांढरे | १ |
| सिरवले | १ |
| दुदसेकर | १ |
| मोहेते | १ |
| पिंगळ | १ |
| माळुसुर | १ |
| वागमोडे | १ |
| गुजर | १ |
| कीलावार | १ |
| सोंडकर | १ |
| कलां | १ |
| माजे | १ |
| आवले | १ |
| निंबळकर | १ |
| चेव्हान | १ |
| पंवार | १ |
| वांकडे | १ |
| मोरे | १ |
| हामाल | १ |
| सरवाद | १ |
| गोगवल | १ |
| धुलवणे | १ |
| जावद | १ |
| वतन | १ |

याखेरीज मुसल्मान व कानडे व फिरंगी व हावसी व बेरडी वगैरे बारगीर तीस च्याळीस हाजार यांची जमाव होता. एक कलम.

किल्वाची नाव निसी तपसील.

| | |
|---|---|
| रायगड | १ |
| नरजाला | १ |
| सिरसीगड | १ |
| विशेष गड | १ |
| आनमाई | १ |
| प्रबलगड | १ |
| वसंतगड | १ |
| पनाळा | १ |
| लिंगणा | १ |
| मधुरीगड | १ |
| वर्धनगड | १ |
| कोपगड | १ |
| सुधागड | १ |
| मथुनगड | १ |
| अलकागड | १ |
| आशयागड | १ |
| नरायणगड | १ |
| कोमलगड | १ |
| पेरादागड | १ |
| रुपगड | १ |
| रसालगड | १ |
| नरसींगगड | १ |
| वीरहागड | १ |
| भुधरगड | १ |
| राज्यासागड | १ |
| सुरतगड | १ |
| गोरखगड | १ |
| कुरानगड | १ |
| नरगड | १ |
| मुगगड | १ |
| विरगड | १ |
| महिपतगड | १ |
| मनोहरगड | १ |
| कनकगड | १ |
| मोहनगड | १ |
| सारंगगड | १ |
| गगनगड | १ |
| वरुडगड | १ |
| तातवडगड | १ |
| माणीकगड | १ |
| रमणगड | १ |
| महिरगड | १ |
| येशवंतगड | १ |
| चेधनगड | १ |
| सामानगड | १ |
| सुंनारगड | १ |
| ससणगड | १ |
| मल्लगड | १ |
| रायेगड | १ |
| मारमागड | १ |

| | | | |
|---|---|---|---|
| कुरंगगड | १ | पाठणचीगड | १ |
| सुरतगड | १ | पांडवगड | १ |
| लानगड | १ | सिंहगड | १ |
| पावनगड | १ | मोहोली | १ |
| वंधनगड | १ | महिमनगड | १ |
| हलवंतगड | १ | देवगड | १ |
| महिपतीगड | १ | मंचलागड | १ |
| विचित्रगड उर्फ रोहिडा | | विट्ठलगड | १ |
| गंभीरगड | १ | प्रतीतगड | १ |
| व्याघ्रगड | १ | कंच्यनगड | १ |
| मंजनगड | १ | प्रसीधगड | १ |
| मचेंद्रगड | १ | कोनेरीगड | १ |
| अदिवातागड | १ | मंगलगड | १ |
| विसापुर | १ | काळुगड | १ |
| तुयगड | १ | त्रियंबकगड | १ |
| कनकगड | १ | सिधगड | १ |
| हेमानगड | १ | मोहनगड | १ |
| बाहिरगड | १ | मोरगीरी | १ |
| मथुरागड | १ | असेरेगड | १ |
| वैराटगड | १ | अवचीतगड | १ |
| सामरगड | १ | पानगड | १ |
| माहानगड | १ | दोतगड | १ |
| रवलगड | १ | मोलहारगड | १ |
| अदिवंतागड | १ | विश्रांतीगड | १ |
| पटा | १ | श्रीमंतगड | १ |
| हरमुतगड | १ | गुणवंतगड | १ |
| प्रतापगड | १ | सनकरगड | १ |
| कोथलागड | १ | ठकमकागड | १ |
| अनंदगड | १ | मोहरगड | १ |

| | |
|---|---|
| साळेरे | १ |
| भामगड | १ |
| घोसाला | १ |
| वर्धनगड | १ |
| मळजागड | १ |
| मतागड | १ |
| लोखेडांगड | १ |
| गुजनगड | १ |
| मावोंजगड | १ |
| गोवलकोट | १ |
| रुद्रमाल | १ |
| मोरगड | १ |
| सिधगड | १ |
| मंडणगड | १ |
| थारवीगड | १ |
| हारिचेंद्रगड | १ |
| रामसेनागड | १ |
| भीमगड | १ |
| पानगड | १ |
| हतेगड | १ |
| तीमानेगड | १ |
| पूरंदरे | १ |
| जुनासावरगड | १ |
| भुजंगगड | १ |
| सुंदरगड | १ |
| परलीगड | १ |
| सुरगड | १ |
| मृगवनगड | १ |
| चेंद्रगड | १ |
| भवनगड | १ |
| पारगड | १ |
| जावलागड | १ |
| हनुमंतगड | १ |
| भाँडारगड | १ |

येकुन एकसे पन्नास १५० किले-याखेरीज कितेक गड होते व पाणी यांतील जंजीयरे बीत तपसीलवार

| | |
|---|---|
| कुलाबा | १ |
| विजयदुर्ग | १ |
| सिंदुदुर्ग | १ |
| रत्नागीरी | १ |
| खोवरी | १ |
| विजदेदुर्ग | १ |
| मालवण | १ |
| फिरंगी | १ |
| पदवाडी | १ |
| कडवाचाकोट | १ |
| सिपीला | १ |
| सुर्वणदुर्ग | १ |
| कनकदुर्ग | १ |
| वेगरुळ | १ |
| मरु | १ |

एकुन चवदा. १४ किले.

याखेरीज मुलुकगीरीचे किले व सुभे.

| | |
|---|---|
| चेउल | १ |
| कल्याण | १ |

| | | | |
|---|---|---|---|
| भीवडी | १ | चरोर | १ |
| माल्वण | १ | जावली | १ |
| काढे | १ | सुभा | १ |
| मीनस | १ | कुंदाल | १ |
| तारले | १ | खांदे | १ |
| सामनगड | १ | अंमाले | १ |
| मसुरल | १ | खानदेश | १ |
| मीरज | १ | मल्मापुर | २ |
| फालठणा | १ | खुबाजपुर | २॥ |
| बाराप्रावले | १ | पुणेदेश | १ |
| खाठाट | १ | सुभा | १ |
| राजाफिरी | १ | येकुन | ३२ |
| राजपुरी | १ | कर्नाटक किले सुमार | |
| विज्यापुरी | १ | सितगड | १ |
| दाभले | १ | अरान | १ |
| व्याव्हारगड | १ | गोजरा | १ |
| कद्धाड | १ | चंदि | १ |
| वाइ | १ | साजरा | १ |
| जुनर | १ | वगैरे. ५ वांच | |

कर्नाटकि मुलुक लक्ष व्होनाचा या खेरीज फाराखाना पैकी जिनस जमखाने व चांदण्या व पडदे हर जिन्नस व कनाता व असमानगीरी व सुजन्या व गाडीचे गैरीजिनस याची पाहाणी जाली नाहि. अजमासे दागीने सुमार ९००० या खेरीज किला किला सामान दारुगोळी व तरवरा व तलेवतबाखु व मिर्च्या व मीराणा बाब होता. त्यांची हिसाव पाहिलि नाहिं व पागेची खागरे व जिनलांडे पटे व हुमेयाचें संख्यास पारावरा नाहि कलम १.

किल्याचे हकमास किले पाहून पालख्या व अबदागीरीया होत्या. संभाजीराजे सिंव्हासनारुढ होऊन ज्याच्या त्यास कायेम करुन वस्त्रे

दिल्ही. सर्व कारभार टेऊन नानाप्रकाराचे योग अनुष्टान केली. माहाराजास वश्य करुन घेतले. रेढे मारावे पूजाकारावी थोर थोर ब्रम्हणास प्रायेश्रीत ध्यावी ऐसें अरंभीले — तेंव्हा मराठे साइरे व ब्राम्हण व पंडिवराव याणी सांगीतलेकीं राज्यांत प्रयोजन अनुष्टान होत आहेत येणे करुन राज्यास बरे नाहिं. अपला स्वधर्म चालविल्यानेच कल्याण होईल ऐसे समजावीलें. तेंव्हा कवजी बावानी ब्रह्मण व मराटे फितवे करीतात म्हणौन माहाराजास सागोन कितेक लोकाचा नाश करवीला याज करींता सर्वांनी तो सांगेल ते मान करावे ऐसे जाले. कितेक लोकानी दरबारास जावेयाचे ठाकिले. चवदासे रेढे मारीले. च्यार हाजर बकरी मारीली च्यार हजार बकरी मारीले आणि महोत्सव केला. ब्रह्मण व हरिदास व कितेक जन मिळोन होते. त्यांत कितेकं मृत्यपावले. तेंव्हा माहाराजानी कवी कलशयांसी पुसिलेकीं या समारंभाचे नाव काय. त्याणी उत्तर दिल्हेकीं माहाराज सिंव्हासनारुढ जाले शत्रू नाशहोतील-विनाशन मोहात्छव म्हणून सांगीतले. तधनंतरे कालपुरुष करुन रथावर धातला. तो कुत्रीम होता. याज मुले माहाराज माधारे फिरले तो रथाचे चाक मोडिले. उपरांतीक हतीवर बसुन समारंभे करुन मिरवत माहालांत आले. मग तुला केली. धर्म बहुत केला. कवि कलुश याणी जे सांगावे ते माहाराजानी ऐकावें ऐसे जाले. त्याजवर माहाराज पनालीयांस आले. तेथे सोमाल्या तळयावर ब्रम्हणास प्रायश्चीते दिल्ही. तो वर्तनान आलेकीं अकबरशाहाचा पात शाहावर रुसुन आला. त्याजकाडिल किल्ले होते ते बालाजी व अवजी व बहिरजी यानी घेतले. आणी तेथून उतरोन येते समङ्ग मार्गी फरंजद भेटेले. त्याणी अन्नाजीपंतास मारीले म्हणून त्यास समागमे घेऊन पन्हाळी यासी आले. माहाराजास सहवर्तमान निवेदन केले. माहाराजानी हाती खाली घालून मारीले. तो अकबरशाहाचा पुत्र त्रीब्यंकास आला. तो मजमदार येऊन पोहांचले. भेठि जाहाल्या त्यास राहावयास जागा जैतापूरी दिल्हे. तो दिलीहून पातशाहाच्या फौजा त्यांचे पाठिवर मुबलग आल्यां. तो पातशाहाचा पुत्रासमागेम रजपुत वगैरे ठेक सामान होते. त्याणी पातशाहा जाधयास पोंहचून माधारे जावे तो निभाव नहोय

याजकरीतां माहाराजानी जैसिंग जाधवराव व मानसिंग मोरे समागमे दिल्हे. तो वाटेस मोगलाच्या फौजेची व यांची गांट पडली. युध्य जाल्यावरी. जाधवराव मोरे याणी शरत केली. मोगलास कोंडुन घातले. जाधव रावयांसी जैसिंग राईकितावा दिल्हा. रजपुतास पोहोंचून दिल्हे. अकबर-शाहाचा पुत्र इकडे तीनी वरुष राहिला. तो मागती दिल्लीहून फौज बहुत आली याजमुळे निर्वाहा नहाये. ऐसे जाणून जळमोर्गे पोहोंचवावे तो जंजीरेकर हवासीयाणे बहुत शेखीकेली. त्याजवर कवि कलशयाणी बावाजी रघुनाथ यांसी रवाना केले. त्याज बरोबर अरमार व मावले लोक व मायनाला व दवलतखान व कासीं महमद व गोविंद मनोहर सरदार देऊन रवाना केले. आपण पातशाहापूरास येऊन पातशहा जाहियास घेऊन रत्नागीरीस गेले. तेथून गांगोलास आले. तेथे पुत्र जाहाला. त्याचे नाव सिवाजी ठेविले. बहुत उछहा व धर्म केला. दाहा परभु राजपुरीचे मसलतीस पाठवित होते. त्याणी मारगीरी साधीली-अगराठ-कारणारी व पदम दुर्ग वगैरे त्याजवरुन मारगीरी केली किला जेर केला. कुणसीहून अरमाराहुन लगट मोटि केली. तोफखंडी दारुची होती. ती अतांजी व दत्ताजी व रामजीपंत याणी बहुत प्रयत्न करुन आणोली. ऐसा नाना प्रकारे प्रयत्न केला. हबसी जेर होऊन रात्रीस पळून जाणार हे वर्तमान ऐकुन तारवात मारगीरी करुलागले तो कवि कलुशास सरकारकुनानी जाऊन सांगीतले. मीराजपुरीस पैका बहूत खर्च जाला. आणी अध्याप येतनाहि. राज्यांतील मजमुपरभुचे घरास गेली आहे. आणी दर एक कामांत त्याच्या राजपुरीचा काम साध्य जाले. त्याज पुढे दुसरा कोठतेहि विषम सर कारकुनानी चित्तांत आणून कवि कलुशास नाना प्रकारे समजाविले. त्याणी माहाराजास सांगीतले किं दाहा परभुने वैके खर्च बहूत केला. परंतु राजपुरी येत नाहिं. त्यास उठऊन आणावे. त्याज वरुन माहाराजानी वाडीयांतील भले लोकांस पाटवून हाती धरुन आणीले. खर्च करुन थोडीया साटि कामाचा नाश केला. अरमारा होते. दौलतखान गोविंद मनोहर भंडारी व गोविंद जाधव, कासीं महमद साणी उरुच खेडिंतुन नागोठणी या वरुन दिवपठणी यास गेले. हबसी मागती दावला. रात्रीचे श्वास्यां

करुन लागला. लोकांचे कदिले धरुन नेउलागले. कितेकास खंडी बांधीले. तो रणमस्तखान कल्याणास आला. त्याजवरी संभाजीराजे गेले. मोगलाचे लश्करांत दाणा नाहि तेंव्हा अरमारा वरुन सामान पुरविले. जुंज जाले. रणमस्तखान जेर जाला. मोगलाच्या कोटास मोरचे लाविले. त्याजवर रोहिलाखान धाऊन आला. युध्या बहूत जाले. माहाराज राय गडीस आले. त्यास वीरवाडिस मंडितघातले. बहूत आराशपंताचे भेटिची जालि. पंता बराबर पंचेविस हजार फौज व कर्नाटक पयादे होते. रघुनाथपंत शाहाणे कर्तुत्वेकरुन कोट बरोबर जमात पाहून माहाराजानी कारभार सांगीतला कारभार करुन लागले. हे वर्तमान कवि कलशास असाध्ये-जाले, त्यानी प्रयोग करुन मारीले. पंती चाळीस लक्षाची जीनस आणीला म्होता तो माहाराजास नजर केला व सरकारकूनास मेजवान्या केला त्याजबरोबर कवि कलुशयीसीहि मेजवान्नी केली असतां त्याणी अपाये केला. याज मुळे कुल मराठे व ब्राम्हण व सरव-कारकून आपले जागी खिन जाले किं राज्यास अपाये कवि कलश यानी आरंभिला बरकसीस सर्वासी लावली. कवीज महिपतगडास इमारत पाहावयास गेले. तेथुन विशाळगडास आले. तेथे सिरकेयाने विचार केला जे या दुसमानाला राज्या बुडविले यास नेऊन मारावे म्हणून पंचेवीच हजार हशय जमावा केला. हे वर्तमान कोनरपंत कवजी बाब कडिल कार भारी होते त्याणी कवजी बाबास कळविले. त्यानी माहाराजास लेंहुन सिरक्यावर हला करविली. बहूत मारीले-त्यावर पिलाजी सिर्के व गखोजी सिर्के मोगलाईत गेले. फिरगी याणे फोंडयास वेढा घातला. फोंड जेर केले. माहाराजास खबर पाठवीली. माहाराज जैतपुरी राहिले होते. आणी ताकीद केली होती जे कोणी अर्जकरील त्याची गर्दन जाईल. त्याजवरुन कोणीहि अर्ज नकरीं. काहि उपाये चालेना. तेंव्हा फोंडयाचा नाईकवाडि होता. त्याणे लोकांचे कविले व लोक मारीले जातात याजकरीतां आपले जिवावरी उदार होऊन बोंबा मारीली. माहाराज पाण्यांत खाले होत. तेथे ऐकोन कोणहि बोंब मारीली म्हणून बोलीले. तो नाईकवाडी पुढे उभा राहिला. आणी अर्ज केलांकी पाण्यांतील जेनावरे येऊन माहाराजाचा जागा जेर केला. लोकांचे कबीले मारीले जातात म्हणून

बोलीला. हे फेकोन तेच क्षणी श्वारी त्यार करुन फौजस ताकीद केली जे फोंडीयास जात असे तेंव्हा तेथून अहोरात्री तीन दिवस फोंडीयास पोंहचले. लोक वाटेस बहूत थकून राहिले. तेथे दादाजी हरेकर व धर्माजीनागनाथ सरसुभेदार पुढे भेटिस आले. हे वर्तमान फिरंग्यीस कळतांच फिरगीयाणे वेढा काढुन चालीला. वाटेवर करलिवांकीली होते. आणी तोफखाना मागेपुढे चालीला. तो माहाराजानी फौज आपली जमाव करुन घोडी घातली. तो माहाराजाचे क्मानेस तीनी गोळ्या लगल्या. त्याजवर धर्माजीपंत अर्ज केलाकीं पुढे न जावे. सर्व फौज थेऊ ध्यावी आणी फिरंगीयास वेढोन ध्यावे. ते न ऐकतां तैसच पुढे चालिले. तो लश्करहि येऊन पोहांचले. रुपाजी भोसले व संताजी जगथाप व मानसिंग मोर आले परंतु लवकर न आले म्हणून त्यावर ईतराजी केली. तो मावलेहि दाहाजार येऊन पोहोंचले. लश्कर सहवर्तमान लगठ फीरंगीयाचा गोवा पर्यंत केला. फिरंगी वहूत नारीले. कांहि समुद्रांत बुडुले. मग जाऊन कुंभारजुन घेतले. तेथेहिं हजार फिरंगी मारीले. तेथुन फते जाहलियावर संगमेश्वरी राहिले. कुंडली प्रांतीचे लोक घरास जावयास निरोप दिल्हा. त्याणी कुंडलि वालकाविले. कवि कलशाणी गडोगडिचे सामान खर्च केला. आणी इमारती राहाविल्या सिंवदि व लोक दूर केला. कुल मुलकगीरीचे सुभेदार व हावाल्दार व माहोला माहालाचे कमावीस दार यांस तमाम तलवा करुन आणीले. आणि बाजयात्त त्याजवर काहाडिले. तेंव्हा कितेक लोक पळुन गेले याप्रमाणे कबजी करणी करुन राज्यास आपाये केला. ऐसे वर्तमान जाले. तो पातशाहाचा फौजा एऊन फोंहचल्या तेंव्हा कबजीनी तिकडे फितुर करुन माहाराजास पुत्रासहवर्तमान धरुन दिलेहें. राजाराम शांतजाले. ताउराउसाहेब रायगडास गेली होती. इकडे संभाजीराजे व त्याचे पुत्र शाहुराजे व कबजीबावा ऐसे दिलीस नले. पातशाहाची भेटी जाली. तदनंतर कोणे येके दिवसी पातशाहा संभाजी माहाराजासी म्हणून लागलेकिं मुसल्मान होणे. त्यावरुन पातशाहासी माहाराजानी उत्तर केले जे "आपली बेगम आहे ती अम्हास धयावी म्हणीजे मुसलमान होतों" हे ऐकोन पातशाहानी त्याच्या डोळयावरुन नील फिरविले. हे वर्तमान

पातशाहा जादिस कळले. मग तीनें आपले लग्न केलें नाहिं. सेवटवर बेगमच राहिलीं. शाहूमाहाराज होत त्यास अपले पुत्र म्हणउन पाळण केले. ऐसी कित्तेक दिवस जाले. तो कोणें एकें दिवसी पातशाहा-जाहीनें अर्ज पातशाहास केला जे साहेबी आपल्यास काहि अंदण यद्यावे. तेंव्हा पातशाहा बोलिले जे काये मागवयाचे असेल ते मागणे. त्यावरुन पातशाहाजादि बोलीलीकीं जेथेपर्यंत आपली पातशाहाहि तेथ पर्यंत मला चवथाई दिली पाहिजे. पातशाहा खुशवत होऊन सनदा करुन दिल्या. तदनंतरी शाहुमाहाराजाचे लग्न सिधकेडिकर जाछवरायांची कंन्या आणून केले. पातशाहानी नवरी पाहावयास आणीवीली तेंव्हा जाधव-रावयांची चितांत आलेजे आपण मराटे आपली रीतकी बायेकां कोणाचे द्रिष्टीस नपडावा. ते समई कुणबिणीचा पोरगी विजुबाई म्हणून होती. तीस अंलकार भुषणे देऊन दर्शनास नेली. तेंव्हा पातशाहास समजले किं कुत्रीमसे कळलें. पातशाहानी त्या पोरगीचा डोईवर हात टेविला वरदि म्हणीजे तु राज्यकरसील. पुढे जाधवरायाची कन्या वारली त्याजवर राजा-शाहु दक्षेणेस आले. शकं १६२९ आणीक लग्नें दोन केली. त्याजवर श्रीमंत शाहुमाहाराज याणी राज्य वर्षे ४३ त्रेतालीस सातारा येऊन केले. त्याउवरी शकं १६७१ श्रुक्ल संवछरी मार्गसीर्षवध्य त्रीतीयेस श्रीमंत राजा शाहु कैलासवास जाले. राज्य राजश्री वाळरजी बाजीराव प्रधान यासी नीरविले. त्याणी राजे शांत जालीयावर बारसी पानगावीहून श्रीमंत राजा-रामास आणून राज्यावर स्थापिले. तो मातुश्री ताराऊ साहेब याणी कैदंत टेऊन आयणा जवळ सातारा राहिली राजायचा कारभार पेशवे करुंलागले. त्जाजवर शेक १६८२ वित्रम नाम संवछरी पौष श्रुध अष्टमी बुधवार मुकाम पानपत दिली पलिकडें चाळीस कोस तेथे सुज्यातदौला व नजीबखान रोहिला व अवदल आलि गिलज्यायांचा लढाईत बाळजी बाजीराव प्रधान यांचे पुत्र विश्वासराव यासी गोळी लोगोन शांत जाले. राजेश्री सदासीव चिमणाजी दक्षणेची फौज समागेमे होती. तितकीं बुडिविली पुढें शेक १६८३ वृषनाम संवछरी जेष्ट वध्य शष्टी भोमवारी बाळाजी बाजीराव प्रधानयासी चौघटीका रात्रीस देव आज्ञा जाली. संनीधानी राजेश्री रघुनाथराव धाकटे बंधु व पुत्र चिरंजीव राजेश्री माधवराव

कारभारी होते. त्यास राज्या निरविले. पेशवाईचे वस्त्रें माधवराव बळाल यासी राजश्री राजाराम साहेब याणी दिल्ही. शेक १६८३ आषाढ शुध्ध १० दशमी माधवराव बळाल यासी मृत्युजाला. शकं १६९४ संवछारी कार्तीक वध्य ८ अष्टमी मुकाम थेउरी जाला. त्यांची स्त्री सौभाग्यवती रमाबाई याणी सयागमन केले. कलम १. श्रीज्ञानदेव उर्फ ज्ञानेश्वर यानी भगवत गीतेचे टीका प्राकृतांत केल होत यानी समाधी घेतली शकं १२१२ खरसंवछर कार्तीक वध्य ११ एकादसी कलम १. येथोर बकर समाप्त.

ही बखर बच्योबा पैठणकर हाली वस्ति पुणे याज कडून प्रती लिहिले ते मुतसहि नारायणराव व आनंदराव इलाखे मजेर कालेन मकींजी साहेब सुपरींटेंनड्यांट आफ दि मैसुर (Superindent of the Mysore) बा तारीख २५ माहे जुलाई सन १८०७ इसवि दर जागा मुला मुठा नदि संगम मुतसिल पुना.

—: * :—

Printed at
RATHNAM PRESS
MADRAS-1